# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९२**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक ५ / एप्रिल २००१

## संपादकीय

### तुमचे अस्तित्व प्रेरणादायी होते

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद भूषविल्यानंतर आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी शब्दश: आयुष्यातल्या क्षणन् क्षणाचे सोनं केलेले शिक्षणमहर्षी डॉ. वा.ना. बेडेकर गेले त्या घटनेला १४ एप्रिलला वर्ष होत आहे ! वर्ष पहाता पहाता गेले असले तरी या वर्षातील सर्व दिवस, दिवसातले सर्व क्षण त्यांची स्मृती सतत जागी आहे. महाविद्यालयात असताना, नौपाड्यात असताना, कोणत्याही क्षणी डॉक्टरांची भेट व्हायची. अजूनही डॉक्टर भेटतील, नेहमीच्या मायेने, ममतेने चौकशी करतील असे वाटत रहाते. पण साकार झालेली शिक्षण स्वप्ने पाहता पाहता, हा स्वप्नांचा वाटसरू साकार स्वप्ने मागे सोडून अज्ञात प्रदेशात निघून गेला.

विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांतील सर्व माणसे, ठाणे भारत सहकारी बँकेतील कर्मचारी आणि अनेक कुटुंबे, ज्यांचे ते फॅमिली डॉक्टर होते, सर्वांना एकटे सोडून डॉक्टर गेले. काळ तर कोणासाठीच थांबत नाही. डॉक्टर गेल्याने जी उणीव निर्माण झाली ती भरून येणार नाही. हे सर्व कटु असले तरीही वास्तव !

पण डॉक्टरसाहेब, तुमच्या मागे राहिलेले आम्ही सर्व कुटुंबीय तुमचा आदर्श ठेवून, त्यानुसार कार्यरत राहण्याचा प्रयत्न करीत जगत आहोत. तुम्ही कर्मयोग नुसता जाणलाच नाही तर जगलात. तुमच्या श्रद्धा, काम करण्याचा वेग व आवेग, तुमच्या स्वप्नांची गगनभरारी हे सर्व लगेच आम्हाला येणार नाही हे आम्ही जाणतो. पण प्रामाणिकपणे तुम्ही दाखविलेल्या मार्गावरून चालण्याचा प्रयत्न आम्ही केला तरच तुम्हाला ती आदरांजली ठरेल.

तुमची आठवण प्रेरणादायी आहे. त्यामुळे एखादे काम करता न आले तर ''प्रयत्ने वाळूचे कण रगडता...'' ही तुमच्यातली जिद्द, तुमची कार्यनिष्ठा जगण्याला सतत प्रयोजन देतात. आपल्या महाविद्यालयात असणाऱ्या झाडांकडे पाहिले की, झाडे लावणारे तुम्ही दिसता, अध्यक्षीय भाषणातले तुमचे अचूक मितभाषी पण मोलाचे सांगणे सारखे मनात ऐकू येत रहाते.

डॉक्टरसाहेब, लौकिक अर्थाने तुम्ही नसलात तरी आमच्या प्रत्येकाच्या मनात तुम्ही आहात. आम्ही जे काही करू ते चांगलेच करू, आपल्या संस्थेच्या कल्याणासाठी करू असा आशीर्वाद द्या !

**तुमच्या स्मृतीला मन:पूर्वक वंदन !!**

# फुलपाखरांचे वेध

‘‘पिरीडी’३ या कुलातील फुलपाखरांमध्ये मुख्यत्वे पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाचे प्रभुत्व आढळते. म्हणूनच त्यांना ‘‘यलो ॲन्ड व्हाईट्स’’ असे संबोधले जाते.

पिवळे धम्मक ग्रास यलो, पांढरे शुभ्र साईक आणि विविधरंगी जेझेबेल या फुलपाखरांव्यतिरिक्त महाविद्यालयाच्या परिसरात आढळणारी ‘‘पिरीडी’’मधील फुलपाखरे आहेत - सालमन अरब, यलो ऑरेंजटीप, कॉमन वॉन्डरर आणि अल्बेट्रॉस.



ही ‘‘यलो ॲन्ड व्हाईट्स’’ फुलपाखरे ऋतुमानानुसार रंगामध्ये बदल दर्शवितात. शुष्क रखरखीत वातावरणात त्यांचे रंग निस्तेज होतात; पंखावरील खुणा अस्पष्ट होतात. मात्र ऑगस्ट ते डिसेंबर मधील आर्द्र वातावरणात आढळणाऱ्या फुलपाखरांचे रंग अधिक गडद असतात ती अतिशय तेजस्वी दिसतात. भारतातील गवताळ भागापासून ते सदाहरित जंगलांपर्यंत या कुलातील फुलपाखरे आढळतात. फुलांमधील मध हे त्यांचे आवडते खाद्य ! जिथे जिथे हे उपलब्ध तिथे तिथे ही फुलपाखरे नक्कीच दिसणार आणि म्हणूनच बगिचांमधील लहान सहान झुडुपांभोवती ही घिरट्या घालताना दिसतात. सामान्यत: जमिनी लगतच्या झुडुपांवर या कुलातील फुलपाखरांचा वावर असतो. जेझेबेल आणि अल्बेट्रॉस मात्र या नियमाला अपवाद आहेत. ही फुलपाखरं अगदी उंच, झाडांच्या शेंड्याजवळसुद्धा आढळतात.

अल्बेट्रॉस हे साधारण जेझेबेल एवढे पांढऱ्या रंगाचे फुलपाखरु आहे. त्याच्या पंखाच्या कडा काळ्या असतात. कॉमन ग्रास यलो, साईक आणि सालमन अरब यांच्या तुलनेत अलबेट्रॉस आपल्या परिसरात कमी प्रमाणात दिसतात.

ज्ञानपथाचा खाडीजवळील जो भाग आहे त्या भागात सालमन अरब भरपूर दिसतात. पंख मिटल्यावर निव्वळ पिवळी दिसणारी ही फुलपाखरे उडताना, पंख उघडल्यावर मात्र वेगळीच दिसतात. रंग विटकरी असतो आणि त्यावर काळ्या खुणा दिसतात. आकारही लहान म्हणजे साधारण कॉमनग्रास यलो इतका असतो. खाडी जवळील खारफुटीच्या झाडांमध्ये आढळणारे ‘साल्वाडोरा’ ही सालमन अरबच्या अळीची खाद्यवनस्पती आहे. त्यामुळेच आपल्या परिसरात सालमन अरब मोठ्या संख्येने आढळते.

यलो ऑरेंज टीप आणि वॉन्डरर मात्र अतिशय अल्प प्रमाणात दिसतात. ‘येलो ऑरेंजटीप’ या नावातच त्याची ओळख पटवणारे रंग आहेत. पंखांचा रंग पिवळा असून पुढील पंखांचा टोकाचा भाग नारींगी रंगाचा असतो. जरी दोनच रंग या फुलपाखरात असले तरीही ते उडताना फार सुंदर दिसते.

कॉमन वॉन्डररमध्येही निळा आणि काळा असे दोन रंग आढळतात. चमकदार निळ्या पंखांवर काळ्या रेषा असतात. त्याची अळी मात्र अगदी हिरवीगार असते. पानामधून चटकन ओळखता येत नाही. कॅपारीसे कुलातील वनस्पती या अळ्यांची खाद्यवनस्पती आहे.

**- डॉ. पूनम कुर्वे**
प्राणिशास्त्र विभाग, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

# दिशा


**वर्ष सहावे / अंक ५ / एप्रिल २००५**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक १० वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'एक समाजव्रती डॉक्टर' | श्री. वि. करंदीकर | ३ |
| २) | शतकत्रय कर्ता भर्तृहरी (लेखांक २२) | शं. बा. मठ | ५ |
| २) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने | यशवंत साने | १० |
| ३) | समाज प्रबोधन पत्रिकेतील ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरीक्षणांची सूची | सूची संकलन : स्मिता सत्यवान सावंत | १४ |
| ४) | 'सही' वेडा माणूस मुलाखत | सौ. दीपाली हिंदळेकर | १९ |
| ५) | सुभे कल्याण | स्मृती जोशी | २३ |
| ६) | जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीचा तंत्रशिक्षणावरील प्रभाव | प्रा. डी. के. नायक<br>प्रा. टी.व्ही. मोहितेपाटील | २५ |
| ७) | अलौकिक संत श्री समर्थ रामदास | सुरेंद लागू | २८ |
| ८) | गीता - यज्ञ अर्थात् जीवनाचे आचरणशास्त्र (भाग १-२-३) | आशा भिडे | ३१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३८ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणीजाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी. धनादेश (चेक) "**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**" या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.


वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# 'एक समाजव्रती डॉक्टर'

*शिक्षण महर्षी कै. वा. ना. बेडेकर यांचा प्रथम स्मृतीदिन १४ एप्रिल २००५ रोजी आहे. या निमित्ताने त्यांच्या नंतर अध्यक्षपदाची धुरा संभाळणारे श्री. श्री. वि. करंदीकर यांनी डॉक्टरांच्या पवित्र स्मृतीस वाहिलेली शब्दांजली.*

*- संपादक*

डॉ. वा.ना. बेडकर शरीर प्रकृतीने लहान पण कर्तृत्वाने महान अशी ही व्यक्ती. माझी व त्यांची प्रथम भेट त्यांच्याच गोखले रोड वरील दवाखान्यात १९५० साली झाली. मी नागपूरहून नुकताच ठाण्यात आलो होतो. नागपूरला असताना नियमित दर वर्षी मला थंडी ताप यायचा. १९५० साली असाच ताप आला व पेशंट म्हणून डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी तपासून मला एक इंजेक्शन दिले. त्यामुळे माझा त्यांच्यावर कायम विश्वास बसला. मुळातच सामायिक कार्य करण्याचा माझा स्वभाव असल्यामुळे मी साहजिकच त्यांच्या सामाजिक कार्यात ओढला गेलो. शेवटपर्यंत नैसर्गिकरित्या पूर्ण गुंतला गेलो. डॉक्टरकीचा व्यवसाय सांभाळून देखील शिक्षण व समाज क्षेत्रात त्यांनी भरीव कार्य केले आहे व ते यशस्वी झाले.



डॉक्टरांची स्मरणशक्ती अलौकिक होती. ते मातृमुखी होते. अशी व्यक्ती भाग्यवान असते असे म्हणतात. वार, दिवस आणि सण व त्या निमित्त होणाऱ्या घटना व प्रसंग मोठ्या आनंदाने व कौतुकाने कथन करीत. १९९६ त्यांची स्मरणशक्ती कमी कमी होत गेली. त्याचे उदाहरण द्यायचे झाले तर त्यांच जन्म २० फेब्रुवारी उपवासाचा दिवस. शनिवार महाशिवरात्र मात्र स्मरणात होती पण १९९७-९८ पासून वर्षाचे मात्र विस्मरण होऊ लागले. जन्म १९१६, १९१७ का १९१८ चा? त्यांचा सारखा घोटाळा व्हायचा. कामानिमित्त त्यांचे घरी व दवाखान्यात माझे सदोदित जाणे येणे असायचे. त्यांचा जन्म कोणत्या साली हे शोधून काढावे असे मी ठरविले. मी आमच्या ब्रह्मदेव कुलदैवताच्या दर्शनाला म्हणून १९९६ साली कोकणात कोर्ले येथे गेलो होतो. तेथील आमच्या गुरुजींकडून (२० फेब्रुवारी) १९१७ हे साल पंचांगानुसार नक्की केले. डॉक्टरांची स्मृती जागृत झाली मनोमन त्यांनी मला शाबासकी दिली.

डॉक्टर निर्व्यसनी व शाकाहारी होते तर त्यांचे जेवण अल्प व वेळी अवेळी असे. त्यांच्या नेहमीच्या तुरु तुरु चालण्याच्या पद्धतीनेच वेगाने मोटार गाडी हाकणारे होते. हल्ली हल्ली त्यांना प्रकृति अस्वास्थामुळे मोटर गाडी चालविण्याची बंदी केली होती. त्यांना माणसाची चांगली जाण होती. नेमकी व थोडीच माणसे ते जवळ करीत असत. तसा त्यांचा अनेक शेकडो माणसांचा परिचय होता.

एका वेळी त्यांच्या डोक्यात अनेक कल्पना येत असत. ते स्वत: स्वप्नाळू होते व इतरांना चांगली स्वप्ने बघा म्हणून उपदेश करीत. त्यांना हाती घेतलेल्या कामात यश यायचे हा त्यांचा हातगुणच होता. उदाहरणार्थ दवाखाना, विद्या प्रसारक मंडळ, भारत सहकारी बँक, उत्कर्ष मंडळ वगैरे.

१९९६ साली डॉक्टरांनी लिहिलेल्या **'स्मृति-लहरी'** या त्यांच्या आत्मचरित्रात अनेक ठिकाणी त्यांची खरी ओळख देणारी स्वभाव वैशिष्टेच स्पष्ट होतात. एके ठिकाणी तर ते म्हणतात, 'लाथ मारीन तेथे पाणी काढीन अशी धमक माझ्या मनात होती.' केवढा उच्च आत्मविश्वास. अशा या जिद्दी स्वभावामुळेच ते ६० वर्षांहूनही अधिक काळ अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे गेलेले. एका नंतर दुसरे व दुसऱ्यानंतर तिसरे अशा रीतीने काम करीतच रहायचे हा त्यांचा स्वभाव. कित्येकदा दवाखान्यातून / व्हिजिटहून दुपारी १.३० / २.०० वाजता घरी येऊन लगेच कॉलेजमध्ये ३ च्या सभेस जाण्यास तयार. मी त्यांची वाट पहात असायचो. थोड्याच वेळात फ्रेश होऊन ते मला म्हणायचे, 'करंदीकर चला.' हे शब्द आजही माझे कानात रुंजी घालतात. नौपाड्यात ते गरीबांचा डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होते.

दिनांक १४/४/२००४ पर्यंत वयाच्या ८८ व्या वर्षीही डॉक्टर अतिशय जोमाने व वेगाने चालायचे व काम करायचे. हे सर्व करताना त्यांचे पाय जमिनीवर असायचे हे महत्त्वाचे. आपण जे काही केले आहे किंवा करू शकतो, त्यात आपल्याला भेटलेल्या असंख्य माणसांचा वाटा आहे हे मनोमन ते जाणत होते. त्यामुळे आपल्या हातून झालेल्या कामांमध्ये इतरांचाही वाटा आहे हे ते अगत्याने मान्य करीत होते. त्यांच्या मनाचा केवढा हा मोठेपणा. आयुष्यभर समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या या डॉक्टरांनी वर उल्लेख केल्याप्रमाणे असंख्य माणसे जमवली. संस्था जगवल्या व निसर्गाच्या ऋणाचे स्मरण ठेवून झाडेही जगवली. ही व्यक्ती नसून ती एक शक्तीच होती असे मी मानतो. डॉक्टरांचे वास्तव्य ठाण्यात होते पण मनाने मात्र ते कोकणातील त्यांच्या जानशी गावी व राजापूरला असायचे. राजकारण हा त्यांचा पिंडच नव्हता. परंतु काही व्यक्तींच्या विशेष आग्रहामुळे १९६२ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीसाठी ते उभे राहिले. पण त्यांना अपयश आले.

डॉक्टरांचे विचार, कार्य व आदर्श आज आम्हा सर्वांना प्रेरणा देत आहेत. रामदास स्वामींच्या 'मरावे परी किर्तीरुपी उरावे' या उक्ती डॉक्टरांच्या बाबतीत खऱ्या ठरतात.

**- श्री. वि. करंदीकर**
अध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ / उत्कर्ष मंडळ, ठाणे

## परिसर वार्ता

### वाचन संस्कृतीवरील कार्यक्रम

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल व 'दिशा'चे कार्यकारी संपादक मोहन पाठक यांची आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरील साहित्य सौरभ या सदरात २० मार्चरोजी मुलाखत प्रसारित झाली. 'वाचन संस्कृती दशा आणि दिशा' याविषयावरील २० मिनिटे झालेल्या या मुलाखतीत त्यांनी वाचन या विषयाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. आकाशवाणीच्या भक्ती गोरे-प्रधान यांनी सदर मुलाखत घेतली.

मोहन पाठक यांचे यापूर्वीही आकाशवाणी व दूरदर्शनवर कार्यक्रम प्रसारित झाले आहेत.

- संपादक

# शतकत्रय कर्ता 'भर्तृहरी'

*भर्तृहरीच्या नीतिशतका संबंधातील लेखमालेतील श्री. शंकरराव मठ यांचा तिसरा लेख देत आहोत. - संपादक*

**(लेखांक तिसरा)**

मूर्खपणा घालविण्यासाठी कोणतेही औषध उपलब्ध नाही. हे या खालील श्लोकात पहावयास मिळते. अनेक गोष्टींना शास्त्रात औषधे सांगितलेली आहेत व मूर्खपणाची विदारकता कवीने रेखाटली आहे.

**शक्यो वारयितुं जलेन हुतभुक् छत्रेण सूर्यातपो,**
**नागेन्द्रो निशिताङ्कुशेन समदो दण्डेन गौगर्दभौ ।**
**व्याधिः भेषज संग्रहैश्च विविधैः मन्त्रप्रयोगैर्विषं**
**सर्वस्यौषधमस्ति शास्त्रविहितं मूर्खस्य नास्त्यौषधम् ॥७॥**

पाण्याने आग बुझविता येते. ऊन छत्रीने निवारता येते. मदोन्मत्त गजराजाला धारदार अंकुशाने वठणीवर आणता येईल. गाई आणि गाढवे यांना काठीने आवरता येईल. विविध रोग औषधाच्या साहाय्याने बरे करता येतील, मन्त्राच्या साहायाने विष उतरवता येईल. याप्रकारे शास्त्रात सर्वांना औषध सांगितले आहे. मात्र मूर्खपणा घालविण्यासाठी कोणतेही औषध नाही.

साहित्य, संगीत आदी कलांचे ज्ञान नसलेला माणूस म्हणजे शिंग व शेपूट नसलेला द्विपाद पशूच होय असे कवीने म्हटले आहे याबद्दलचे खालील दोन श्लोक पहा.

***साहित्य सङ्गीत कला विहिनः ।***
***साक्षात् पशुः पुच्छ विषाणहीनः ।***
***तृणं न खादन् अपि जीवमान : ।***
***तम् भागधेयं परमंपशूनाम् ॥ ८॥***

साहित्य, संगीत आदी कोणत्याही कला ज्यांच्या अंगी नाहीत तो मूर्तिमंत पशूच मानावा. फक्त त्याला शिंगे नाहीत व शेपूट नाही. तो गवत न खाता जगतो हे पशूचे मोठे भाग्यच मानले पाहिजे.

*येषां न विद्या न तपो न दानं ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ।*
*ते मृत्युलोके भुविभारभूता मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ॥ ९ ॥*

ज्याच्याजवळ विद्या (ज्ञान) तप, दातृत्व ज्ञान व शील तसेच सद्‌गुण व धर्माचरण काही नाही ते या धरणीला भार होऊन जगतात, ते माणसाचे रूप धारण करून जगणारे पशूच होत.

कवी म्हणतो केव्हाही व कुठेही मूर्खाशी संबंध येतो हे खालील श्लोकात स्पष्ट केले आहे.

***वरं पर्वत दुर्गेषु भ्रान्तं वनचरैः सह ।***
***न मूर्खजन संपर्कः सुरेन्द्रभवनेपवपि ॥ १० ॥***

अरण्यातील प्राण्याबरोबर कडे-कपारीतून हिंडणे परवडले पण मूर्खाच्या सहवासात इंद्राची राजमंदिरे देखील नकोत.

विद्वानांविषयी नित्य आदर बाळगा असे कवी सांगत आहे.

***अधिगत परमार्थान् पण्डितान् माऽवमंस्था : ।***
***स्तृणमिव लघुलक्ष्मीर्नैव तान् संरुणद्धि ।***
***अभिनव मदलेखाश्याम गण्डस्थलानां***
***भवति न बिसतन्तुवारणं वारणानाम् ॥ ११॥***

परमार्थ ज्याला समजला अशा प्रज्ञावंताना तुच्छ मानू नका, कवडीमाळे व क्षुद्र वैभव अशाना अडवू शकत नाही. नूतन स्राव होत असलेल्या हत्तीची गंडस्थळे सावळी होत असतात. त्यांना कमलतंतू कधीतरी बांधून ठेवतील काय?

थोडक्यात विद्वान संपत्तीला कस्पटासमान मानतात वैभवाने त्यांना वश करण्याचा प्रयत्न करू नका. इतर भूषणे ही खरी नव्हेत, वाणी वैभव हेच खरे भूषण त्याबद्दलचा हा श्लोक.

**केयूरा न विभूषयन्ति पुरुषं हारा न चन्द्रोज्वला**
**न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालङ्कृता मूर्धजा ।**
**वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते**
**क्षीयन्ते खलु भूषणानि सकलं वाग् भूषणं भूषणम् ॥ १२॥**

बाहूभूषणे, चंद्राप्रमाणे तेजस्वी हार, स्नान, उटी लेपन, नानाविध फुले, सुशोभित केश कलाप हे काही माणसाचे खरे अलंकार नव्हेत. संस्कारयुक्त भाषा हीच मानवाचा खरा अलंकार मानणे योग्य होईल. इतर अलंकार कालांतराने नष्टही होतात.

खालील श्लोकात विद्येची स्तुती केली आहे. विद्या हाच पुरुषार्थ होय.

***विद्या नाम नरस्य रूपमधिकं प्रच्छन्न गुप्तं धनम्***
***विद्या भोगकरी यश: सुखकारी विद्या गुरूणां कुरु:***
***विद्या बन्धु जनो विदेश गमने विद्या परं दैवतं***
***विद्या राजसु पूजिता न तु धनं विद्याविहीन: पशु : ॥ १३ ॥***

विद्या हे माणसाचे गोड रुप व गुप्त धन आहे. भोग, कीर्ति आणि सुखे मिळवून देणारे साधन आहे. विद्या गुरूंचा गुरू आहे. परदेशी विद्याच आपला बांधव, विद्या ही श्रेष्ठ देवता, राजे लोकात विद्येलाच मान आहे. द्रव्याला नाही. ज्याच्या अंगी विद्या नाही तो पशु होय.

कोणत्या व्यक्तीशी कसे वागावे, लोक व्यवहार म्हणजे काय हे खालील श्लोकात पहा.

***दाक्षिण्यं स्वजने दया परजने शाठ्यं सवा दुर्जने***
***प्रीति: साधुजने, नयो नृपजने, विद्वत् जनेषु आर्जवम् ।***
***शौर्यं शत्रुजने क्षमा गुरुजने नारीजने धूर्तता***
***ये चैवं पुरुषा: कलासु कुशला: तेषु एव लोकस्थिति: ॥ १४ ॥***

आपल्या माणसाविषयी दाक्षिण्य, सेवकजनावर दया, शठाशी नेहमी शाठ्य, सज्जनावर लोभ, राजे लोकांशी नीती (राजनीति) ने व्यवहार, पंडिताशी सरळपणा, शत्रूशी शौर्याने वागणे, वडिलधाऱ्यांविषयी सहनशीलता, स्त्रीजातीशी धोरणाने वागणे अशाप्रकारे जगात सर्वांशी कुशलतेने वागणारे लोकच व्यवहारात निपुण ठरतात.

सत् संग का करावा, तो का आवश्यक आहे याविषयीचा श्लोक.

***जाड्यं धियो हरति सिञ्चति वाचि सत्यं***
***मानोन्नतिं विशति पापमपाकरोति ।***
***चेत: प्रसादयति दिक्षुतनोति कीर्तिं***
***सत्संगति: कथय किं न करोति पुंसाम् ॥ १५ ॥***

बुद्धी तल्लख करते, बोलण्यात सत्याचा समावेश करते, मानमान्यता वाढवते, पापी दृष्टी दूर करते, मन प्रसन्न ठेवते. चोहोबाजूला नाव लौकिक मिळवून देते. माणसाला ती काय बरे देत नाही. (असा सत्संगाचा महिमा वर्णिला आहे.)

कवीचे यश अजरामर असते हे कवीने खालील श्लोकात वर्णिले आहे.

***जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धा: कवीश्वरा :।***
***नास्ति येषां यश: काये जरामरणजंभयम् ॥ १६ ॥***

जयजयकार असो कविजनांचा जे नवरसात निष्णात आहेत. त्यांच्या कीर्तीला कधीच म्हातारपण व मरण नाही.

काव्य प्रकाशात मम्मटाने ब्रह्मदेवाच्या सृष्टीपेक्षा काव्यसृष्टी श्रेष्ठ प्रतीची असल्याचे म्हटले आहे.

कल्याणाचा सर्व सामान्य मार्ग खालील श्लोकात वर्णिलेला आहे.

***प्राणाघातात् निवृत्ति: परधनहरणे संयम: सत्यवाक्यम् ।***
***काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथामूकभाव: परेषाम् ।***
***तृष्णास्त्रोतोविभङ्गो गुरुषु च विनय: सर्व भूतानुकम्पा ।***
***सामान्य: सर्व शास्त्रेषु अनुपहत विधि: श्रेयसां एष पन्था: ॥***

*१७॥*

कोणत्याही जीवाची हिंसा न करणे, दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार न करणे, सदा खरे बोलणे, योग्यवेळी यथाशक्ती दानधर्म करणे, परस्त्रीविषयी चर्चा न करणे, वासनेवर आपला ताबा ठेवणे. थोर मंडळीशी नम्रतेने वागणे, सर्व प्राणिमात्रावर दया करणे हा शास्त्रसंमत मार्ग कल्याणप्रद आहे. हा सामान्य व्यवहार सार्वजनीन आहे. प्रत्येक व्यक्ती याचे पालन करून कल्याण साधू शकते.

एकदा आरंभिलेले काम जो पूर्णतेला नेतो तोच खरा उत्तम पुरुष असे कवीने सांगितले आहे.

***प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचै:***
***प्रारभ्य विघ्न विहिता विरमन्ति मध्या:***
***यत्नै: पुन: पुनरपि प्रतिहन्यमाना: ।***
***प्रारब्ध मुत्तमजना: न परित्यजन्ति ॥ १८॥***

अडचणी उपस्थित होतील म्हणून कार्याला सुरूवात करीत नाहीत ते 'कनिष्ठ' होत. कार्याला आरंभ करून विघ्ने भेडसावताच कार्य सोडून देतात ते 'मध्यम' होत. विघ्ने आली असता त्यावर मात करून हाती घेतलेले कार्य पूर्णत्वाला नेतात तेच 'उत्तम पुरूष' होत.

जो पुरूष आपल्या वंशाला ऊर्जितावस्थेला नेतो तोच खरा जन्मला असे म्हणावे.

***परिवर्तिनि संसारे मृत: को वा न जायते ।***
***स जातो येन जातेन याति वंश: समुन्नतिम् ॥ १९॥***

सतत बदलत असणाऱ्या या जगात कोण बरे मेल्यानंतर पुन: जन्माला येत नाही? ज्याच्यामुळे वंशाची कीर्ती वाढते तोच खरा जन्मला असे म्हणावे.

मृत्युलोकात अनेक जीव जन्म घेतात व मरतात. समर्थ म्हणतात, ''किती एक ते जन्मले आणि मेले.'' जो आपल्या वंशांची शान वाढवितो तोच खरा जन्मला असे म्हणावे. इतरांची खीजगणती नाही.

याच संदर्भात आणखी एक श्लोक आहे अशी माणसे सर्वांचे पुढारीत्व पत्करतात अथवा आपला विकास साधून नष्ट होतात. पुढील श्लोक या दृष्टीने प्रकाश टाकणारा आहे.

***कुसुमस्तबकस्येव द्वयी वृत्ति: मनस्विन: ।***
***मूर्ध्नि वा सर्वलोकस्य शीर्यते वन एव वा ॥ २०॥***

महामता लोकांची मनस्थिती फुलांच्या ताटव्याप्रमाणे (पुष्पगुच्छाप्रमाणे) असते. एक तर ते शिरोधार्य होते अगर वनात सुकून जाते. याचप्रमाणे ही माणसे पुढारीपण तरी स्वीकारतात नाहीतर सुगंध देत वनातच जीर्ण होतात.

द्रव्याविना सर्व गुण निरर्थक होत असे मानणारी मंडळी कसा विचार करतात हे खालील श्लोकात मांडले आहे -

***जाति: यातु रसातलं गुणगण: तस्य अपि अधोगच्छताम्***
***शीलं शैलतरात् पततु अभिजन: संदह्यतां वन्हिना ।***
***शौर्ये वैरिणि वज्रामाशु निपततु अर्थोऽस्तु न: केवलं***
***येन एकेन विना गुणा: तृणलवप्राया: समस्ता इमे ॥ २१॥***

जातपात खड्ड्यात जावो, गुणसंपदा ती गडप होवो, शील डोंगर कड्यावरून कोसळो, घरंदाजपणाला आग लागो, शौर्य गाजविणाऱ्या शत्रूवर वज्र तात्काळ पडते, पण धन मात्र मला सोडून न जावो त्याशिवाय सर्वगुण गवताच्या काडी समान आहेत.

थोडक्यात पैसा मात्र मला मिळत राहो. इतर गुणांचा पैशाशिवाय काही उपयोग नाही. द्रव्याच्या प्रतिष्ठेसंबंधी आणखी एक श्लोक उद्धृत केला आहे -

***यस्यास्ति वित्तं स नर: कुलीन: स पण्डित: सश्रुतवान् गुणज्ञ :***
***स एव वक्ता स च दर्शनीय: सर्वे गुणा: काञ्चनमाश्रयन्ति ॥२२॥***

ज्याच्याजवळ धन आहे तोच घरंदाज, तोच विद्वान, तोच बहुश्रुत व गुणवान् तोच वक्ता तोच देखणा - सारे गुण धनवानाच्या आश्रयाला राहतात.

व्यावहारिक दृष्टीने द्रव्य हेच महत्त्वाचे, सर्वच गोष्टी द्रव्याधीन हे कवीला सांगावयाचे आहे.

*दानं भोगो नाश: तिस्रो गतय: भवन्ति वित्तस्य*
*यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गति: भवति ॥२३॥*

संपत्तला तीन वाटा असतात, दान, उपभोग व नाश. जो मनुष्य दानधर्म करीत नाही, उपभोग घेत नाही त्याची संपत्ती तिसऱ्या वाटेला जाते म्हणजे नष्ट होते.

राजाने प्रजेचे पालन कसे केले पाहिजे याविषयी कवी राजाला उपदेश करतो -

*राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेनां ।*
*तेनाद्य वत्समिव लोकममुंपुषाण ।*
*तस्मिंश्च सम्यगतिशं परिपोष्यमाणे ।*
*नाना फलै: फलति कल्पलतेन भूमि: ॥ २४ ॥*

हे राजा या पृथ्वीरूपी गायीचे दोहन करण्याची तुझी इच्छा असेल तर आज प्रजारूपी वासराची चांगली काळजी घे. प्रजेला चांगले पोसलेस तर धरणीमाता कल्पलतेप्रमाणे तुला विविध फळे देईल. म्हणजे तुझे राज्य धनधान्याने समृद्ध होईल.

भेटेल त्या माणसाकडे मदतीची याचना करणे अयोग्य हे चातकाच्या अन्योक्तीने कवीने खालील श्लोकात सांगितले आहे.

*रे रे चातक सावधान मनसा मित्र क्षणंश्रूयताम् ।*
*अम्भोदा बहवो हि सन्ति गगने सर्वेऽपि नैतादृशा : ।*
*केचित् वृष्टिभि: आर्द्रयन्ति वसुधां गर्जन्ति केचित् वृथा ।*
*यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि दीनं वच: ॥ २५॥*

मित्रा चातका, शांत मनाने एक क्षणभर माझे ऐक. आकाशात खूप ढग असतात पण सारेच सारखे नसतात. काही ढग आपल्या जलधारांनी धरित्री भिजवून टाकतात पण काही उगाच गडगडाट करतात. म्हणून मित्रा जो जो भेटेल त्याच्यापुढे दीनवाणीने तोंड वेंगाडू नकोस.

थोडक्यात सगळेच दानशूर नसतात. प्रत्येकाकडे मदतीची याचना करू नये असे कवीचे म्हणणे आहे.

दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाना शक्यतो टाळावे हे खालील श्लोकात सांगितले आहे

*दुर्जन: परिहर्तव्य: विद्ययाऽलंकृतोऽपि सन् ।*
*मणिना भूषित: सर्प: किमसौ न भयङ्कर:? ॥२६॥*

दुर्जन विद्याविभूषित असला तरी टाळावा, नाग रत्नविभूषित असतो तो काय भयंकर नसतो?

दुष्ट व सर्प यांची जोडी ही टाळण्यालायकच आहे.

पुढील श्लोकात सज्जन व दुर्जन यांच्या मैत्रीचे स्वरूप सांगितले आहे.

*आरम्भगुर्वी क्षयिणीक्रमेण । लघ्वी पुरा वृद्धिमतीच पश्चात् ।*
*दिनस्य पूर्वार्ध परार्ध भिन्ना । छायेव मैत्री खल सज्जनानाम् ॥ २७॥*

दिवसाच्या आरंभी सावली मोठी (लांब) असते. हळूहळू ती आकुंचन पावते. दुपारी ती अल्प असते व संध्याकाळ होत जाईल तशी ती वाढत जाते अशी जी भिन्न सावली असते त्याप्रमाणे खल व सज्जनांची मैत्री असते.

खल जनांची मैत्री सुरुवातीला गाढ असते मग ती कमी होत जाते. सज्जनांची मैत्री सुरुवातीला बेताची असते मात्र ती वाढत जाते हा जीवनातला अनुभव एका दृष्टांताने कवीने अभिव्यक्त केलेला आहे.

या श्लोकात मोठ्या माणसाचे लक्षण सांगितले आहे.

*विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा ।*
*सदसि वाक्पटुता युधिविक्रय: ।*
*यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ ।*
*प्रकृति सिद्धमिदं हि महात्मनाम् ॥ २८॥*

*विपत्काली धैर्य प्रभुपणि सहिष्णुत्व बरवे ।*
*सभे पांडित्याचा प्रसर, समरी शौर्य मिरवे ।*
*स्वकीर्तीच्या ठायी प्रचुररति, विद्याव्यसनजे ।*
*तयांचे ते स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे ॥*

- वामन पंडित

संकटसमयी धैर्य वैभवात क्षमा, सभेत वाक्‌चातुर्य, युद्धात पराक्रम, यशाची चाड, ज्ञानाचे व्यसन, हे सहा गुण महापुरुषांचे स्वभावसिद्ध आहेत.

वैभव काळी व विपत् काळी थोर लोकांची मन:स्थिती कशी असते याचे वर्णन -

*संपत्सु महतांचित्तं भवति उत्पलकोमलम् ।*
*आपत्सु चमहाशैल शिलासंघातकर्कशम् ॥ २९॥*

भरभराटीच्या काळी मोठ्या माणसाचे हृदय कमलाप्रमाणे कोमल असते मात्र संकट समयी ते प्रचंड पर्वतावरील शिळेसारखे कठीण बनते.

तुकारामाचा अभंग इथे उपयुक्त ठरतो.

*मऊमेणाहुनी आम्ही विष्णुदास ।*
*कठीण वज्रास भेदू जैसे ॥*

जशी संगत घडेल त्याप्रमाणे जीवन घडते हे एका दृष्टांताने स्पष्ट केले आहे.

***संतप्तायसि संस्थितस्य पटासो नामापि न ज्ञायते ।***
***मुक्तज्ञाकारतया तदेव नलिनी पत्रस्थितं राजते ।***
***स्वातौ सागरशुक्ति संपुटगतं तन्मौक्तिकं जायते ।***
***प्रायेणाधम मध्यमोत्तम गुण: संसर्गतो जायते ॥३०॥***

**वामन पंडित -**

*तोयाचे परि नावही न उरते संतप्त लोहावरी ।*
*ते भासे नलिनी दलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी ।*
*ते स्वातीस्तव अब्धिशुक्तिपुटकी मोती घडे नेटके ।*
*जाणा उत्तम मध्यमाधमदशा संसर्गयोगे टिके ॥*

तापलेल्या लोखंडावर पाणी पडले असता त्याचे नाव निशाण राहात नाही. तेच कमलपत्रावर पडले तर मोत्याच्या आकाराने विराजत राहते. स्वाती नक्षत्राचा थेंब शिंपल्यात पडला असता त्यातून सुबक मोती तयार होतो. याप्रमाणे बहुधा कनिष्ठ मध्यम व उत्तम गुण सहवासानुसार जन्माला येतात.

येथे आदर्श पुत्र, पत्नी व मित्र यांची लक्षणे सांगितलेली आहेत.

***य: प्रणियेत् सुचरितै: पितरं स पुत्र: ।***
***यत् भर्तुरेत हितमिच्छति तत् कलत्रम् ।***
***तत् मित्रं आपदि सुखेच समक्रियं यत् ।***
***एतत् त्रयं जगति पुण्यकृतो लभन्ते ॥ ३१॥***

या जगात भाग्यवन्ताना या तीन गोष्टी लाभतात.

१) आपल्या सद्वर्तनाने वडिलांना आनंद देतो तोच खरा मुलगा.

२) पतीचेच कल्याण चिंतणारी तीच खरी पत्नी.

३) दु:खात व सुखात जो सारखाच वागतो तोच खरा मित्र.

***जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच ।***
***जे दे पतीस सुख फार कलत्र तेच ।***
***जो एकरूप सुखदु:खपणी गडी तो***
***हा लाभ पूर्व सुकृताविण काय होती ॥***

**- वामन पंडित**

(क्रमश:)

**- शं.बा.मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने

*भारतीय संस्कृतीचे वैदिक ज्ञान, भारतीय तत्त्वज्ञान व दर्शनांचे मूळ यासंबंधी एक निश्चित विचार देण्याचा या लेखाचा रोख आहे. या विषयावरील चिंतन व व्यासंग असणारे श्री. यशवंतराव साने 'दिशा'साठी खास लेखमाला देत आहेत. त्यातील हा पहिला लेख. या विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती.*
*- संपादक*

(भाग १)

डॉ. अँटोनियो टी.डी. निकोलास म्हणतात की, कुठल्याही संस्कृतीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्या संस्कृतीला ज्या 'विशिष्ट मॉडेल'चे रूप प्राप्त झाले त्याचा तलास, शोध व जाणीव होणे जरूर आहे.

आपण ह्या लेखात 'भारतीय संस्कृती' व विशेषत: तिच्या वेदिक ज्ञानाच्या, तत्त्वज्ञानाच्या व दर्शनाच्या मूळ बीजाचा मागोवा घेणार आहोत.

हा विषय मोठा व संशोधन करण्याच्या आवश्यकतेचा आहे हे नमूद करावे लागेलच. पण, निकोलास आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उभा करताहेत की निरनिराळ्या मानवी जागतिक संस्कृत्यांच्या अभ्यासातून असे जाणवते की त्याची एक विशेष वर्गवारी करावयाला हवी. 'Audial' आणि 'Literary' म्हणजे 'नाद' (श्रुती) आणि 'लिखीत-लिपीबद्ध भाषा' वर आधारलेल्या ! इथले 'शब्दप्रयोग' कदाचित मुद्यांचा आशय स्पष्ट करीत नसतील, तरीही पुढच्या विवेचनातून प्रकाश पडेल.

यानंतर ते 'भगवद् गीता' ही एका 'Audial', 'Musical Culture' (श्रुती) संगीत संस्कृतीमध्ये सांगितली (गायली) गेली असे सांगतात व दोन्ही पद्धतीच्या नियमांचा, तत्त्वाचा पसारा व पृथक्करण मांडतात. याला एक आश्चर्यकारक पुरावा सापडला.

'श्रीमद् भगवद्गीता' लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांचे लहानसे पुस्तक मी काढले आणि अध्याय चौथा नमुन्यादाखल काढला. त्याच्या शेवटी वाक्य होते -

''इति श्रीद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे 'ज्ञानकर्मसंन्यास'योगो नाम चतुर्थोऽध्याय: ॥ ४॥

त्याचे मराठी भाषांतर लोकमान्य टिळक असे करतात.

''याप्रमाणे श्रीभगवंतांनी गायिलेल्या म्हणजे सांगितलेल्या उपनिषदांत ब्रह्मविद्यान्तर्गत योग म्हणजे कर्मयोग - शास्त्रावरील श्रीकृष्ण व अर्जुन यांच्या संवादांतील ज्ञानकर्मसंन्यासयोग नावाचा चौथा अध्याय समाप्त झाला.''

लो. टिळक यांच्याही नजरेतून हा स्लेष सुटलेला दिसतो की भगवान कृष्ण यांनी मुळात हा ब्रह्मज्ञानाचा अर्जुनाला केलेला उपदेश हा एखाद्या Audial, Musical भाषेत केलेला असेल व त्याची लिखित संहिता हे मूळ स्वरूप नसणारच. अर्जुनानेही हा उपदेश ऐकला, पाहिला (विश्वदर्शन योग) जाणला व तोही प्रत्यक्ष भगवान कृष्णाकडून.

आपण जी गीता जाणतो ती 'संहिता लिखित' अशा

स्वरुपातच !!

मग, कोणत्या गोष्टी ह्या ज्ञानपद्धतीतून सुटत असतील बरे ? ह्याचा अभ्यास करू या.

पण, मग मला एकदम जाणवले की ह्या पद्धतीने प्रश्नाची मांडणी करणे योग्य होणार नाही. खरा प्रश्न हा भाषेच्या अभ्यासाच्या टोकाकडून सुरू न करता - ज्या संस्कृतीच्या ज्ञानाच्या दिशा, आवाका, ध्येय, आदर्श, गाभारा पेलणारी साधने निर्माण झाली त्यात 'भाषा' ही एक चीज - अनेक साधनांपैकी एक, अशी निर्माण झाली - अशी भूमिका घेणे योग्य. त्याप्रमाणे मग अभ्यासाची दिशा असावयास हवी.

संस्कृत भाषेने हे आव्हान पेलले. ह्या भाषेच्या वृद्धी व पद्धतशीर बांधणीचा भार महर्षि पाणिनीने पेलला. त्याने अतुलनीय अशा पद्धतीने व्याकरण बांधले हे कौतुकाने व आदराचे स्थान तर आहेच, पण, हे बरेचसे जगातील इतर भाषेच्या म्हणजे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, रशियन, लॅटिन, रोमन वगैरे वगैरे मानवी भाषेच्या 'जड ज्ञानाच्या' रोखानेच झाले. ह्या सर्व भाषेत संस्कृतचा क्रमांक फारच वरचा आहे यात शंकाच नाही. भारताला हे भूषणावह आहे.

पण, आपण वर पाहिलेल्या 'भारतीय वेदिक संस्कृतीच्या वैशिष्टयपूर्ण अशा 'स्पिरीच्युअल व आध्यात्मिक ध्येय धोरणाच्या बाजूने संस्कृत भाषेने जे काम केले त्याची जाण, मोजदाद व ऋण फारसे पद्धतशीर झालेले दिसत नाही. मंत्रशास्त्र, योग, तत्त्वज्ञान, संगीतशास्त्र, आयुर्वेद वेदिक गणित, भारतीय नृत्य, ज्योतिष, वेदविद्या, आगमशास्त्र ही काही संस्कृत भाषेची अंगे.

आज हा थोर वारसा नीटपणे जपण्याची, वृद्धी करण्याची गरज निर्माण झाली आहे. पण हे करण्यासाठी ज्या 'हिंदू समाजाची' धारणा अनुकूल असावयाला हवी, ती पार नष्ट झाली आहे. ही नुसत्या खेदाची बाब नसून मान खाली घालावयाला लावणारी आहे. संस्कृतीचे पोवाडे व डफ तुणतुणे वाजवणारे विद्वान हा भार उचलावयाला तयार नाहीत - कारण ते असमर्थ आहेत. त्यांच्यावर ब्रिटिश व काँग्रेस राज्यात 'सेक्यूलॉरिझम'चा राजकीय वरवंटा फिरवून 'कंडिशनिंग' करण्यात आले आहे. हे सर्व 'मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीने व भौतिकवादी विज्ञानवादाने साधले आहे. असा एखादा प्रयत्न सुरू झाल्यास त्याला शिक्षणाचे 'Safranisation' चा शिक्का (भगवीकरण) मारून समाजाच्या प्रचलित शिक्षणपद्धतीतून बाद करण्यात येईल याची खात्री आहे.

हा राजकारणाचा भाग असूनही व मला तो टाळावयाचा असूनही केवळ 'संस्कृतीच्या' जडणघडण या क्रियेच्या जबाबदारीच्या भूमिकेतून ही टीका मला आवरणे कठीण झाले आहे.

आता भारतीय संस्कृतीमध्ये ज्ञानाची भूमिका काय आहे ते पाहू या. मानवी प्रगतीची भूमिका काय आहे?

***असतो मा सत् गमय ।***<br>
***तमसो मा ज्योतिर्गमय ।***<br>
***मृत्योर्मा अमृतम् गमय ।***

म्हणजे असत्याकडून सत्याकडे, अंधार (अज्ञान) पासून प्रकाशाकडे (ज्ञानाकडे) व मृत्यू तत्त्वाकडून अमृत - अमरत्वाकडे जाणे ही आपल्या उन्नतीची व्याख्या व ध्येय आहे.

ह्या विश्वाचे दोन भाग आहेत. व्यक्त, नाशिवंत व हे दिसणारे जड जगत १/४ व्याप्तीचे व अव्यक्त पण चिरंतन अस्तित्वाचे आणि ३/४ विश्वव्याप्तीचे आहे. पुरूषसुक्त या ऋग्वेदीय ऋचा काय सांगतात? नारायण ऋषी हा या सुक्ताचा 'द्रष्टा' आहे.

ह्या पृथ्वी, तारे, ग्रह ह्याच्याही 'पलीकडचे' जग अस्तित्वात आहे. ह्याचे भान आपण बाळगत नाही. मग

'पुरुषसूक्त' ही 'हार्ड फॅक्ट' जाणिवेत आणण्याचा प्रयत्न करते.

**एतावानस्थ महिमा । अर्ताऽज्यायाँश्च पुरुषः**
**पादोऽस्य विश्वाभूतानि । त्रिपादस्यामृतंदिवि ॥३॥**

भावार्थ (स्वामी चिन्मयानंदकृत)

एवढे त्याचे ऐश्वर्य आहे; आणि तो 'पुरुष' त्या सर्वांपेक्षा कितीतरी महान आहे. घटना (विश्वा) आणि जीव (भूतानि) ह्यांनी भरलेले हे संपूर्ण विश्व त्याचा केवळ एक चतुर्थांश ('पाद') आहे. त्याच्या ऐश्वर्याचा तीन चतुर्थांश (त्रिपाद) अविकारी चैतन्यरूप आहे.

**त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोऽस्येहाऽऽभवात् पुनः ।**
**ततो विष्वङ् व्यक्रामत् साशनानशने अभि ॥ ४॥**

**भावार्थ :** ह्या विसर पुरुषाचा तीन चतुर्थांश, परिवर्तनशील विश्वाच्या बाहेर आहे. त्याचा एक चतुर्थांश, पुन्हा पुन्हा विश्वरूप धारण करतो. त्यानंतर तो अन्न खाणाऱ्या (चर) सर्व प्राणिमात्रांना आणि कधीच अन्न न खाणाऱ्यांना 'वस्तुमात्रांना' (अचर) व्यापून टाकतो.

तेव्हा हा तीन चतुर्थांश भाग 'अव्यक्त'-अविचल, गुणदोष शून्य, अमेय आणि अक्षर आहे. आणि एक चतुर्थांश भाग पुन्हा पुन्हा निर्माण होतो आणि पुन्हा पुन्हा लय पावतो. या उत्पत्तीमध्ये वस्तुजातांचा विचार करता ज्यांना भोजनादी व्यवहार करावे लागतात असे सचेतन विश्व साशन किंवा जंगम विश्व आणि नदी, पर्वत वगैरे स्थिर वस्तूंचा समावेश असलेले अचेतन स्थावर तथा अनाशन विश्व असे दोन प्रकारचे विश्व उत्पन्न झाले असे दिसते.' (स.कृ. देवधर)

हे सूक्त व त्याचे विस्ताराने दोन ऋचांचे भाष्य लिहिण्याचे कारण हे की मानवाला ह्या सत्यदर्शनाचे 'विस्मरण' झालेले दिसते आहे.

हे वेदिक संस्कृती व भारतीय संस्कृतीचे बीज व सत्यज्ञान आहे. आज दिसणाऱ्या 'वैज्ञानिक, बुद्धिवादी (जड) व भोगवादी पाश्चात्त्य संस्कृतीला, ह्या सत्याची जाण नाहीच, पण फिकीरही नाही. त्या संस्कृतीच्या बुद्धिवादाच्या व भौतिकविज्ञानाच्या अफाट पसाऱ्यात मानवाच्या पृथ्वीवरील 'मर्त्य अस्तित्वाची' जाण नाही - होत नाही - करून घ्यावयाची इच्छा नाही. ह्या मानवी अस्तित्वाची Objective Cosmic Truth and Structure मध्ये काय स्थिती Status आहे याबद्दल अनुत्सुक असणे म्हणजे शुद्ध पलायनवाद व डोळे झाकलेले अंधत्व आहे. काय करायचेय मग त्या भौतिक नाशिवंत आरसे महालाला- काय महत्त्व आहे त्यातल्या व्यावहारिक सर्कशीतल्या ट्रॅपिझला, काय चाटावयाचे आहे त्यातल्या अर्धवट ज्ञानाला व बुद्धीच्या तर्कटांना - हे सगळे एका स्वप्नगत असल्याचेच 'अपूर्ण जीवन' दर्शन व खेळ आहेत ना? ना त्याला 'शेंडी' ना 'बुडखा'. हे अस्तित्व 'एका त्रिशंकूचे' त्याला नाही ठाव स्वतःचा - नाही पाय नाही घर - नाही आकाश. त्याच्या सगळ्या वैभवाचे, ऐश्वर्याचे देखावे पडद्यावर दिसणाऱ्या चित्रासारखे - देह असेपर्यंत भोगाचा भास देणारे. प्रोजेक्शन स्क्रीनवरचे बंद झाले की नाहीसे होणारे - बघणाऱ्या प्रेक्षकासकट !!

अशा अपूर्ण 'जीवनदृष्टीचा' जे आधार आपल्या संस्कृतीला देतात वा मानतात व त्यात समाधान मानतात - ती संस्कृती काय स्थैर्य देणार - काय सत्यदर्शन देणार - काय भूषण देणार - मानवी अस्तित्व व त्याच्या क्षमतेला - त्याच्या 'अमृतपुत्र' अशा आकांक्षेला ?

तेव्हा मग ह्या पूर्ण जीवनदृष्टीला, वेदिक संस्कृतीला आवश्यक झाली दोन जगांचे - व्यक्त व अव्यक्त जगांचे संमलिन घडवून आणणारी साधने, युक्त्या, तंत्र, नियम, भाषा, दर्शने, व्यापार, आचारधर्म व ते वापरण्याचे 'अधिकार', 'पात्रता', नैतिकता, समज आणि संस्कृतीच्या

अंतिम ध्येय धोरणाला सुसंगत अशी जीवनशैली व त्यातील प्रगती व सिद्धता.

'भारतीय संस्कृती' ही खऱ्या अर्थाने ह्या 'मॉडेलला' बांधलेली आहे. तिचे 'जहाज' दिशाहीन भरकटत नाही, अनिश्चतेचा प्रवास करत नाही तर ह्या विश्वरचनेच्या गुह्य ज्ञानाचाही मागोवा घेऊन व त्यातल्या जैविक स्वातंत्र्याच्या अभिव्यक्तीत पण वैश्विक मार्गदर्शनाच्या पथक्रमावर वाटचाल करते.

संस्कृत भाषा ह्या 'स्कीम', रचनेला योजनेला बांधलेली दिसेल. ती कशी ते आता पाहूया. वेद संहिता ह्या मार्गदर्शक बनतात. पण, वेदांची भाषा व गुह्य समजत नाहीत का?

महायोगी अरविंद म्हणतात, 'स्वयं वेद की भाषा भी श्रृति है, एक ऐसी लयबद्ध वाणी है जो बुद्धिसे नही रची गयी वरन सुनी गई है, एक दिव्य शब्द है जो अनन्त में से स्पन्दन करता हुआ उस मनुष्य के अन्त श्रोत्र में प्रविष्ट हुआ जिसने अपने आपको पहले से ही 'अपौरुषेय ज्ञान' को पात्र बना रखा था' ह्या वेदभाषेचे बीज शोधावयाला हवे.

'न्यग्रोध' म्हणजे वटवृक्ष. ह्या वृक्षाच्या वाढीचे विस्ताराचे व पारंब्या (मूळ व जमीन शोधणाऱ्या) रहस्य हे त्याच्या बीजात आहे. बीजाच्या 'प्रोग्रॅम'मध्ये आहे.

पिंपळाचे मूळ (Tap Roots) हे वृक्षाच्या शेंड्यावर आहे व आकाशाचा शोध घेते. कां?

'उर्ध्वमूलमध;शाखमश्वत्थं पाहुख्ययम् ।
छंदासि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित ॥ १॥
(१५ भ. गीता)

''मूळ वर व शाखा खाली असून, कधीही नाश न पावणारा, छंदासि म्हणजे वेद ही ज्याची पाने असे ज्या अश्वत्थवृक्षाचे वर्णन करितात, तो 'वृक्ष' ज्याने जाणिला तो पुरुष (खरा) वेदवत्ता होय.''

ही ज्ञानाची दिशा सांगणारी युक्ती आहे. तेव्हा ह्या दृश्य जगात हा जो मर्त्य मानव आपल्या मर्यादित आयुष्यात, मर्यादित बुद्धीच्या व इंद्रियांच्या मार्फत जर चिरंतन सत्य व ऋत तत्त्वांचा शोध घेऊ इच्छित असेल तर त्याला भौतिक विज्ञानाच्या पद्धतीने किंवा मार्गाने ज्ञान होणे - सत्य, चिरंतन ज्ञान होणे- अगदी दुरापास्त किंवा अशक्यच आहे !!

पण ह्या मर्यादांच्या पलीकडे -कालत्रयातीत, अवस्थात्रयातीत, गुणत्रयातीत, देहत्रयातीत अशा स्थितीत विश्वाबाहेर जाऊन त्रयस्थ भूमिकेतून ह्या विश्वाचे ज्ञान व गूढ जाणावयाचे असेल तर Transcendence म्हणजे पलीकडे - विश्वाच्या मोहमयी, भ्रमात्मक पिंजऱ्याच्या पलीकडे जाणे आवश्यक आहे. हाच मुद्दा श्रोडिंजर, हायजेनबर्ग वगैरे भौतिक विज्ञानाच्या वैज्ञानिकांना Observer आणि Observed ह्या गुंत्यामध्ये भेडसावतो आहे. हताश होऊन ते खरे ज्ञान आपापल्या होऊ शकणार नाही हे जाणतात व त्या 'सत्याचे' Statistical probability म्हणजे 'Uncertainty Principle' 'अनिश्चतेचे तत्त्व' आणि संभावना करून मोकळे होतात.

मग **वेदांतले उत्तर काय आहे ते कसे शोधावयाचे या प्रश्नाकडे वळायलाच लागेल**. त्याला भाषा (संस्कृत), योग, तंत्र, मंत्र, यंत्र, उपनिषदे, पुराणे काय मदत करतात ते पुढच्या लेखात पाहूया.

(क्रमश:)

**- यशवंत साने**
(स्पिरीच्युअल सायन्स सेंटर)
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी : २५३६ ८४५०
ई-मेल : yrsane@eth.net

# समाज प्रबोधन पत्रिकेतील ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरीक्षणांची सूची

सूची संकलन : स्मिता सत्यवान सावंत, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

*ग्रंथालयशास्त्राच्या पदवी स्तरावरील अभ्यासात मुक्त विद्यापीठाने सूची वा कात्रण संग्रह बनविणे अनिवार्य केले आहे. असे अनेक प्रकल्प बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात आहेत. समाज प्रबोध पत्रिका या समाज चिंतन व संशोधनात महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नियतकालिकाने ग्रंथ परिक्षणांसाठी कोणते ग्रंथ स्वीकाले, निवडले हे पाहून त्यांची बनविण्यात आलेली ही सूची. विद्यार्थिनीने घेतलेले कष्ट प्रामाणिक होते. त्यामुळे यात त्रुटी असूनही सूची देत आहोत. या सूचीचा 'दिशा' चे वाचन करणाऱ्या वाचकांना नक्कीच उपयोग होईल. प्रकल्प मुळातून पहावयाचा असल्यास आमचा बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आहे. - संपादक*

## व्याप्ती

'समाज प्रबोधन पत्रिका' हे एक व्यापक व्याप्ती असलेले नियतकालिक आहे. या नियतकालिकात कोणत्याही एका विषयाची माहिती नसून समाजातील प्रत्येक घडामोडींचा विचार या पत्रिकेत केला आहे.

समाजातील अनेक बाबींचा विचार या पत्रिकेत एकत्रितरित्या केल्याने या पत्रिकेची विषय व्याप्ती ही फार मोठी आहे. तसेच वाचकांच्या दृष्टीने विचार केला असता, या पत्रिकेत अनेक विषयांचे विवेचन केल्याने समाजातील सर्वच वाचकांच्या दृष्टीने ही या पत्रिकेची व्याप्ती मोठी आहे.

या पत्रिकेच्या विषय व्याप्तीचा विचार केला असता, समाजातील सामाजिक, आर्थिक घडामोडींचा विचार/ परामर्श न घेता राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक अशा अनेक विषयांना वाहिलेल्या वा विषयांसाठी लिहिलेल्या लेखांचा समावेश या पत्रिकेत असलेला दिसून येतो.

अशा प्रकारे या पत्रिकेची विषय व्याप्तीच सखोल असल्याने समाजातील विद्यार्थी, तज्ज्ञ, लेखक, शास्त्रज्ञ, शिक्षक, व्यापारी, शेतकरी, सर्वसामान्य वाचक अशा सर्व वाचकांच्या वाचनाच्या गरजा या द्वैमासिकातून पुरविल्या जातात.

समाज प्रबोधन पत्रिकेतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरिक्षणे'. याद्वारे विविध ग्रंथांची वाचकांना थोडक्यात परंतु महत्त्वाची माहिती उपलब्ध करुन दिली जाते. अशा परीक्षणांमधील ग्रंथ कोणत्याही एका विषयांशी संबंधित नसल्याने अनेक विषयांवरील ग्रंथ वाचकांना कमी वेळेत वाचता येण्यासाठी ही परीक्षणे उपयुक्त ठरतात.

एकूणच हे नियतकालिक संपूर्णतः समाजाला वाहिलेले असून संपादक व लेखक मंडळीनी वेगवेगळ्या विषयांशी संबंधीत असणाऱ्या ग्रंथांचे परीक्षण वाचकांना उपलब्ध करुन दिले आहे. ज्याचा फायदा समाजातील प्रत्येक वाचकाला आज ही जागतिकीरकणाच्या चक्रात अडकलेल्या वाचन प्रेमी वाचकांना वेळेच्या दृष्टिकोनातून ही परीक्षणे अतिशय उपयुक्त आहे. अशा प्रकारे सर्व वाचक वर्गाला ही पत्रिका उपयोगी असल्याने त्यांची व्याप्ती ही

तितकीच मोठी असल्याने दिसून येते. इतर मराठी नियतकालिकाच्या तुलनेत या नियतकालिकाची व्याप्ती अधिक आहे.

## मर्यादा

प्रत्येक विषयाला एक ठराविक मर्यादा असते. त्याचप्रमाणे प्रकल्प तयार करण्यासाठी ही प्रत्येक अभ्यासकाला मर्यादेची आवश्यकता असते. त्या मर्यादेच्या आधारे ते आपल्या विषयाचा अभ्यास अचूक वा योग्य प्रकारे पार पाडू शकतात.

'समाज प्रबोधन पत्रिकेतील ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरिक्षणांची सूची' हा प्रस्तुत प्रकल्पाचा विषय आहे. प्रस्तुत प्रकल्प निर्मितीमध्ये ही काही मर्यादा पाडून घ्याव्या लागल्या. त्यामध्ये समाज प्रबोधन पत्रिका गेली अनेक वर्षे या क्षेत्रात कार्यरत असल्याने या सर्व वर्षांचा आढावा घेणे शक्य नव्हते.

खुलासा - स.प्र.प. समाजप्रबोधन पत्रिका
- कंसातील नाव ग्रंथपरिचय / परीक्षण लिहिणाऱ्या लेखकाचे आहे.

## ग्रंथ नोंदी

१. *चरित्र ग्रंथ*
**'अच्युत बळवंत कोल्हटकर'**
कुलकर्णी, वि.ह. पुणे : व्हीनस प्रकाशन
(गाडगीळ, पां. वा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ.५७ ते५८

२. *आंतरराष्ट्रीय संबंधपर पुस्तक*
**'अनफ्रेंडली फ्रेंडस : इंडिया ॲन्ड अमेरिका'**
कृष्णन, कुन्ही - दिल्ली : इंडियन बँक को.
(काकडे, सुरेश)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७८/८३ पृ. ५७ ते ५८

३. *कथासंग्रह*
**'अरण्यरुदन'** इनामदार, एस्.डी.
मुंबई : वाल्मीक प्रकाशन
(सुर्वे, भा.ग.)
सप्रप/मार्च-एप्रिल ८२/१०४ पृ. ११४ ते ११६

४. *कविता संग्रह*
**'अरुण कोलटकरच्या कविता'**
कोलटकर, अरुण
मुंबई : प्रास प्रकाशन, १९७७
(पाटील, चंद्रकांत)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७७/७८ पृ. ४०७ ते ४०८

५. *शोषितांच्या समीक्षा*
**'अस्पृश्यतेचे उच्चाटन'** पळशीकर, वसंत
(भोळे, भास्कर लक्ष्मण)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोबर ७५/६५ पृ.३१६ ते ३२०

६. *कथासंग्रह*
**'अंधारवाट'** शांताराम
अमेय प्रकाशन, १९७७
(पोरे, प्रतिभा)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७८/७९ पृ. ५० ते ५१

७. *कविता संग्रह*
**'आलम'** बागवे, अशोक
मुंबई : मौज प्रकाशन गृह, १९८० ते ८१
(सहस्त्रबुद्धे, अविनाश)
सप्रप/मार्च-एप्रिल ८२/१०४ पृ. १०९ ते ११२

८. *चरित्र ग्रंथ*
**'इकॉनॉमिक थॉट ऑफ डॉ.बी.आर. आंबेडकर'**
डोंगरे, मधुकर
आंबेडकर समाज पब्लिकेशन्स
(खांडेकर, ताराचंद्र)
सप्रप/मे-जून७५/६३ पृ. १९४ ते १९७

९. *इतिहास निबंध*
**'इतिहास'** ठाकूर, रवींद्रनाथ
(अनु. कमतनूरकर, सरोजिनी)
पुणे : प्रोस्टिज प्रकाशन, १९७२
(बारलिंगे, सुरेंद्र)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ६५ ते ६६

१०. *अहवाल पुस्तक*
**'इंटर-जनरेशनल कॉन्फिलक्ट इन इंडिया'**
सिन्हा, एम्.पी.
(संपा. ग्रँग्रेड, के.डी.)
मुंबई : नचिकेत पब्लिकेशन, १९७१
(वनारसे, श्यामला)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७४/५८ पृ. ५३ ते ५५

११. *समीक्षा ग्रंथ*
**'इंडियन इनसाइट्स : पब्लिक इश्युज इन प्रायव्हेट परस्पेक्टिव्ह'** लॅसी, केटन
नवी दिल्ली : ओरिऐंट लॉगमन लि., १९७२
(साखळकर, एकनाथ)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७४/५५ पृ. ७९ ते ८०

१२. *अर्थशास्त्र*
**'इंडस्ट्रिअल डेव्हलप्मेंट ऑफ इंडिया पॉलिसी अॅन्ड प्रॉब्लेम्स'** वकील, सी. एन्.
नवी दिल्ली : ओरिएंट लाँगमन
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/मे-जून ७५/६३ पृ. १९७ ते १९९

१३. *कादंबरी*
**'उगवतीचे रंग'** पाटील, भाल
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन
(भेंडे, सुभाष)
सप्रप/मार्च-एप्रिल ७८/८० पृ. १२३ ते १२४

१४. *आत्मनिवेदनपर समीक्षा*
**'उच्चार्थसाधक शंकरराव : शंकरराव देव याच्या विधायक प्रवृत्तीचे संकलन'**
ले. संपा. धर्माधिकारी, भाऊ; सहा. दास्ताने, दत्तोबा
पुणे : साधना प्रकाशन, ३०
(थत्ते, यदुनाथ)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोंबर ८१/१०१ पृ. ३१४ ते ३१६

१५. *कविता संग्रह*
**'उत्तररात्र'** किणीकर, रॉय
पुणे : श्री शब्द प्रकाशन, १९७९
(पाटील, विश्वास)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ८१/१०२ पृ. ३९३ ते ३९५

१६. *स्त्री विषयक समीक्षा पुस्तक*
**'उध्वस्त क्षितिज'** (प्रका. ग्रंथाली)
मुंबई : ३४/९०२ नेहरू नगर, २४
(भावे, नीलीमा)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७८/७९ पृ. ५१ ते ५४

१७. *आत्मनिवेदनपर पुस्तक*
**'एका स्पृश्याची डायरी'** कऱ्हाडे, सदा
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९७२
(जोगळेकर, सुधीर)
सपप्र/मार्च-एप्रिल ७३/५० पृ. ६८ ते ६९

१८. *इंग्रजी चरित्र*
**'एम. एन. रॉय'** कर्णिक, व्ही.बी.
मुंबई : डी-४६, लोकमान्य नगर, माहिम, १९
(गाडगीळ, पां.वा.)
सपप्र/सप्टेंबर-ऑक्टोंबर ७८/८३ पृ. ३३८ ते ३४१

१९. *कथासंग्रह*
**'एरिअल आणि पोरकं पाखरू'** डांगे, अनिल
मुंबई : मौज प्रकाशन
(आठवले, शकुंतला)
सपप्र/जानेवारी-फेब्रुवारी ७८/७९ पृ. ४८ ते ५०

२०. *नाटक*
**'एवम् इंद्रजित'** सरकार, बादल
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन
(परांजपे, प्रभाकर नारायण)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७५/६४ पृ. २५४ ते २५६

२१. *चरित्र*
**'कमलनयन बजाज'** (अनु. भागवत, तारा)
परंधाम प्रकाशन, १९७३
(बापट, भा.रा.)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७४/५८ पृ. ५६ ते ५७

२२. *मुसलमान प्रश्नाची समीक्षा*
**'कम्युनॅलिझम अ स्ट्रगल फॉर पॉवर'**
दीक्षित, प्रभा
मुंबई : ओरिएंट लाँगमन, ७४
(जोशी, रा.भि.)
सपप्र/सप्टेंबर-ऑक्टोंबर ७५/६५ पृ. ३२७ ते ३३०

२३. *कादंबरी*
**'कॅलिडोस्कोप'** बर्वे, अच्युच
मुंबई : मॅजेस्टिक, १९७७
(सात्विक, गौतम)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७८/७९ पृ. ४४ ते ४५

२४. *कथा संग्रह*
**'काजळमाया'** कुलकर्णी, जी.ए.
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, १९७३
(बांदिवडेकर, चंद्रकांत)
सप्रप/मे-जून ७४/५७ पृ. ५३ ते ६१

२५. *विज्ञान*
**'कुतुहल : ८ ते १२ वयोगटांसाठी'**
(संपा. लागू, र.गो.)
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९७८
(शिरोडकर, सु.स.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७९/८६ पृ. १४६ ते १४७

२६. *व्याख्यान संग्रह*
**'कै. दि.के. बेडेकरांची तीन व्याख्याने'**
बेडेकर, दि.के.
पुणे : मागोवा प्रकाशन, १२५९/२, जंगली महाराज रस्ता, ४
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७७/७८ पृ. ४२३ ते ४२५

२७. *कार्यविषयक समीक्षा*
**'कोसबाडच्या टेकडीवरून'** वाघ, अनुताई
(संपा. चिटणीस अशोक)
ठाणे : ऋचा प्रकाशन, १९८०
(कुलकर्णी, शरद)
सप्रप/सप्टेंबर - ऑक्टोंबर ८१/१०१ पृ. ३१६ ते ३१७

२८. *कवितासंग्रह*
**'कोंडवाडा'** पवार, दया
मागोवा प्रकाशन, ७४
(क्षीरसागर, उत्तम)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७५/६४ पृ. २५६ ते २५८

२९. *चरित्रग्रंथ*
**'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'**
माळी, मा.गो.
गारगोटी : आशा प्रकाशन, १९८०
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/ जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ. ५८ ते ५९

३०. *चरित्र ग्रंथ*
**'क्रांतिवीर बाबाराव सावरकर', २री आ.**
गोखले, द.न.
श्रीविद्या प्रकाशन
(गाडगीळ, पां.वा.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ८२/१०३ पृ. ५९ ते ६०

३१. *नाटक*
**'खोट नाटक'** दंडवते, वृंदावन
मुंबई : मौज प्रकाशन, १९७५
(परांजपे, प्रभाकर नारायण)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७६/७२ पृ. ४०० ते ४०१

३२. *इतिहासपर समीक्षा पुस्तक*
**'गतिमानी'** गोडसे, द.ग.
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन
(दातार, श्रीकृष्ण)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ६३ ते ६६

३३. *कादंबरी समीक्षा*
**'गर्भालय व लंघनमूर्ती'** पटवर्धन, रत्नाकर
मुंबई : मौज प्रकाशन
(सूर्यदा)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ७४

३४. *चरित्र*
**'गांधी जसे पाहिले-जाणले विनोबानी'**
(संपा. शाह, कांतिभाई)
वर्धा : परंधाम प्रकाशन, पवनार, १९७१
(पळशीकर, वसंत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७३/६२ पृ. १०३ ते १०७

३५. *चरित्र समीक्षापर पुस्तक*
**'गांधी, लोहिया आणि दीनदयाळ'**
(संपा. परमेश्वरन, पी.)
न्यू दिल्ली : दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूट, १९७८
(दातार, माधव)
सपप्र/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ७४ ते ७६

३६. *आत्मचरित्रपर*
**'गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर'**
(संपा. कीर, धनंजय)
मुंबई : मराठी ग्रंथसंग्रहालय
(काणेकर, अनंत)
सप्रप/मार्च-एप्रिल ७८/८० पृ. १२५ ते १२६

३७. *विज्ञान*
**'गंमतीचे प्रयोग'** (संपा. लागू, र.गो.)
ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९७८
(शिरोडकर, सु.स.)
सप्रप/मार्च-एप्रिल ७९/८६ पृ. १४६ ते १४७

३८. *ग्रंथपरीक्षणांचा संग्रह*
**'ग्रंथवेध'** करंदीकर, वि.रा.
(माईणकर, त्र्यं.गो.)
सप्रप/जानेवारी-फेब्रुवारी ७९/८५ पृ. ६९ ते ७३

३९. *ललित*
**'चर्चबेल'** ग्रेस
मुबई : पॉप्युलर प्रकाशन
(पाटील, विश्वास)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ७७/७८ पृ. ४०८ ते ४१३

४०. सामाजिक समीक्षा
**'चेंज अभंग इंडियाज हरिजन्स; महाराष्ट्र-ए-केस स्टडी'** पटवर्धन, सुनंदा
न्यू दिल्ली : ओरिएंट लॉगमन, १९७३
(कुलकर्णी, श.द.)
सप्रप/जुलै-ऑगस्ट ७५/६४ पृ. २५९ ते २६०

(पृष्ठ क्रमांक २७ वर)

# 'सही' वेडा माणूस

*कर्तृत्ववान व्यक्तींच्या सह्या घेण्याच्या निमित्ताने काही काळ यांचे सान्निध्य मिळाले तर त्यातून आपण समृद्ध होतो. अशाच एक समृद्ध मित्राची ही ओळख... वेगळ्या जगातला माणूस म्हणून ! - संपादक*

एखाद्या व्यक्तीला एखाद्या गोष्टीचा छंद असणे ही तशी नेहमीचीच बाब आणि त्यातूनही आपल्या आवडत्या व्यक्तींच्या सह्या गोळा करणे हा तर अनेकांचा छंद असतो. पण बऱ्याच जणांचे छंद हे अल्पायुषी असतात तर काहीजण त्यांचे छंद मनापासून जपतात. डोंबिवलीचे श्री. सतीश चाफेकर हे या दुसऱ्या प्रकारता मोडतात. खरे तर अनेक ठिकाणी पायपीट करून अनेक पत्रव्यवहार करून अनेक युक्त्या लढवून नील आमस्ट्राँग, नेल्सन मंडेला, दलाईलामापासून अब्दुल कलाम, दुर्गा भागवत, कवी ग्रेस, अनेक टेनिसपटू, एलिझाबेथ टेलर, अमिताभ बच्चन, निळू फुले, सचिन, सुनील गावस्कर पर्यंत अनेकविध क्षेत्रातील देशी, विदेशी अशा १६०० पेक्षा जास्त व्यक्तींच्या सह्या गोळा करण्याचे श्री. चाफेकर यांचे हे वेडच म्हटले पाहिजे. त्यांचे हे वेड किंवा हा छंद त्यांनी नुसताच जोपासला नाही तर या संग्रहाचे पुढे काय याचे व्यवस्थित नियोजनही त्यांनी केले आणि आपल्या वेगळ्या शैलीने किंवा पद्धतीने त्यांनी तो संग्रह लोकांपुढे सादरही केला आहे.

श्री. चाफेकर यांचे हे वेगळेपण त्यांच्या इतर बाबीतही आढळते. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर ''मी B.Com केले मग परत B.A., M.A. केले नंतर जर्मन शिकलो. मधेच आविष्कारसारख्या नाट्य शिबिरात नाटकही शिकलो, एका कन्स्ट्रक्शन कंपनीत नोकरीही केली. पण वयाच्या ३२-३३ व्या वर्षी मला असे वाटले की माझ्या सगळ्या रूढ किंवा आवश्यक गरजा पूर्ण झाल्या आहेत. मग आपण नेहमी गप्पा मारतो मुलांसाठी वगैरे काहीतरी केले पाहिजे तर ते स्वत:च का करू नये म्हणून १९९२-९३ मध्ये नाठाळ, सामान्य बुद्धीच्या, व्रात्य अशा मुलांसाठी शिकवणी वर्ग सुरू केले कारण ८०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या मुलांसाठी आपल्याकडे भरपूर क्लासेस असतात. अर्थात यामुळे मला अनेकांनी वेड्यात काढले आहे. मला माझ्या कुटुंबाची साथ आहे म्हणून असेल पण मला दर १०-१२ वर्षांनी प्रोफेशन बदलावेसे वाटते. मी सध्या टॉक शो सारखे कार्यक्रम करतो, वर्तमान पत्रात सदरेही लिहितो यानंतर कदाचित अजून काहीतरी वेगळे करीन.

या छंदाची सुरूवात साधारण १९६९ मध्ये झाली. त्यावेळी आविष्कार मधे होतो. ओम पुरी वगैरेंची अनेक नाटके बघितली. त्यावेळी मित्रांना सांगायचो आज मी या नटाला बघितले तर त्यांना खरे वाटायचे नाही म्हणून मग बाळ कोल्हटकरांची मी पहिल्यांदा सही घेतली आणि मग ते सुरूच झाले. अनेक लोक मला या बाबतीतही वेड्यात काढतात त्यांच्या मते काय करणार एवढ्या सह्यांचे?

**व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने सह्यांच्या छंदाचे महत्त्व आहे काय? असेल तर कसे?**

हो नक्कीच ! खूप महत्त्व आहे कारण जेव्हा आपण सही घेतो तेव्हा प्रत्यक्ष त्या व्यक्तीला बघतो, भेटतो त्यांच्याशी बोलतो. त्यावेळी त्या व्यक्तीचा प्रभाव आपल्यावर नक्कीच पडतो आणि हे प्रत्यक्ष भेटणे हे टीव्हीवर पहाणे किंवा पेपरमध्ये वाचणे यापेक्षा खूप अगदी खूपच वेगळे किंवा प्रभावी असते. सचिन आज वाईट, चुकीचे

खेळला हे जसे आपण टीव्हीवर बघून म्हणतो तसे तुम्ही जेव्हा सचिनला प्रत्यक्ष खेळताना किंवा नेट प्रॅक्टिस बघून चुकून सुद्धा म्हणणार नाही. ही माणसे जेव्हा मोठी होतात तेव्हा त्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतलेली असते आणि त्यांना जेव्हा आपण प्रत्यक्ष बघतो तेव्हा त्यांच्या वागण्या बोलण्या-चालण्यातून ती दिसते. त्या भेटीतील छोट्या छोट्या गोष्टी आपल्याला खूप काही शिकवून जातात किंवा थक्क करून जातात. आपण नक्की कुठे आहोत आपली यांच्यापुढे लायकी काय हे लगेच जाणवते. मात्र यासाठी आपण Observation, निरीक्षण करणे महत्त्वाचे असते या निरिक्षणातून आपण Self Study आणि मग Self Development करू शकतो. अर्थात हे निरीक्षण सुद्धा योग्य असले पाहिजे. नाहीतर सानिया मिर्झा म्हणते तसे, काही लोक फक्त कोणता ड्रेस घातला कोणती रिंग घातली हेच बघतात. मी कशी झुंज दिली याबद्दल बोलतच नाहीत. अशोक कुमारने मला एकदा स्वत:च्या निरीक्षणाबद्दल सांगितले होते. त्याचे पहिले काही सिनेमे फ्लॉप का गेले त्याबद्दल ते म्हणाले अभिनय करताना मला नेहमी प्रश्न पडे, मी माझे हात कसे ठेऊ, कसे हलवू त्यामुळे मी ते सतत लोंबकळत ठेवत असे आणि ते विचित्र दिसे पण नंतर मी हातामध्ये काहीतरी वस्तू घेऊ लागलो जसे सिगारेट किंवा काठी किंवा शाल वगैरे आणि पुढचे सगळे सिनेमा हिट गेले.' तर अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टी शिकता येतात. माझ्या बाबतीत सांगायचे झाले तर मी खूप जणांकडून खूप काही शिकलो. B.A., M.A. ला तर ज्यांची पुस्तके अभ्यासाला लावली होती त्यांचा अभ्यास करत न बसता मी त्या त्या लेखक कवींना जाऊन प्रत्यक्ष भेटलो, बोललो. त्यांच्याशी चर्चा केली आणि स्वत:ची वेगळी उत्तरे तयार करून पेपर लिहिले. मला वेगळा अभ्यास करावाच लागला नाही. तसेच छंदामध्ये सातत्य पाहिजे.


## *सह्यांची भिंतीवरील गर्दी !*





छंद पुढे सुरू ठेवला पाहिजे. त्यामध्ये Criativity पाहिजे, Presentation पाहिजे. यामुळे मला आपला छंद लोकांपुढे अशाप्रकारे सादर करता येतो की लोकांना हे वेड लागले पाहिजे.

मी यासाठी माझा चित्रकार मित्र अमोल सराफ याची मदत घेऊन माझ्या घराच्या भिंतीवर सह्यांचे स्केच करून घेतले आहे. पुढे मला या घराचे एक वेगळे असे म्युझिअम बनवायचे आहे. आपल्या सचिन तेंडुलकरसह अनेक मान्यवरांनी याची खूप प्रशंसा केली आहे. तसेच या सह्यांचे निरीक्षण करता करता मी Handwriting Analysis चा अभ्यासही केला. हल्ली काही ठिकाणी नोकऱ्यांमध्ये उमेदवारांच्या सहींचे निरिक्षण तज्ज्ञांकडून करून मग त्याला निवडले जाते.




श्री. सतीश चाफेकर

**या सह्यांच्या निमित्ताने आपण आजवर अनेक माणसे बघितली त्या भेटीच्या क्षणांच्या आठवणी.**

लता मंगेशकर, दलाईलामा, बाळ ठाकरे यासारख्या खूप मोठ्या माणसांनी माझ्यासारख्या सामान्य माणसाला खूप छान बोलून कोणतेही आढेवेढे न घेता अगदी सहज सह्या दिल्या तेव्हा खूपच ग्रेट वाटले. एम्.एफ्. हुसेन यांना भेटल्यावर तर मला दुप्पट उर्जा मिळाल्यासारखे वाटले. या वयातही त्यांच्या फिरण्याचा उत्साह प्रचंड आहे. तसेच त्यांच्यावरील पेपर मधील टीका किती खोटी आहे याचाही प्रत्यय आला.

मायकल जॉन्सन या धावपटूने काही अंश सेकंदाने आपला वेग वाढविण्यासाठी घेतलेली मेहनत पाहून थक्क झालो.

तसेच काही जुन्या देखण्या नटाला खूप आवडीने भेटायला गेलो आणि प्रत्यक्षात त्याचे आत्ताचे रूप पाहून फोटोही काढवला नाही, असेही काही अनुभव आले.

मॅच फिक्सिंग प्रकरण जेव्हा गाजत होते यावेळी मी खिन्न होऊन सह्या घेणे बंद करणार असल्यासंबंधीचे एक पत्र मी Sports Magazine ला पाठविले तेव्हा सचिनच्या ते वाचनात आले त्यावेळी सचिनचे P.A. रमेश पारधी यांनी माझ्याशी संपर्क साधला तेव्हा मी देखील माझ्या सह्यांच्या संग्रहाचा फोटो सचिनला पाठवला आणि सचिनने आपली पसंती सहीसह त्या फोटोवर दिली आणि आपली खेळती बॅट व इतर साहित्य देखील मला प्रदर्शनासाठी दिले हे मला खूप मोलाचे वाटते. त्यानंतर मी पुन्हा सह्या जमवण्यास सुरूवात केली.

जालंधरची एक व्यक्ती आहे ते माझ्या एका कार्यक्रमाला आले होते. त्यांनी १०० छोट्या बॅट मला सह्या घेण्यासाठी पाठविल्या आहेत. माझ्या छंदावर खूष होऊन काही श्रोत्यांनी आपल्याकडील सह्यांचा संग्रह मला भेट दिला आहे. (कै.) निरंजन उजगरे यांनीही त्यांच्याजवळील सह्यांचा संग्रह मला भेट दिला तर अशाही काही आठवणी आहेत.

**२० व्या शतकात प्रत्येक क्षेत्रात ज्यांच्या सह्या गोळ्या कराव्यात अशी खूप माणसे होती त्या सर्वांच्या सह्या एकत्रित संकलित स्वरूपात ग्रंथरूपाने संग्रहीत करायच्या झाल्यास अशा प्रकल्पात आपले योगदान काय असेल?**

मी स्वत: देखील याचा विचार केला होता परंतु यासाठी खूप पैसा पाहिजे. इतर कोणी जर प्रकल्प करत

असेल तर मी नक्की सहकार्य करेन. मी माझ्या वर्तमानपत्रातील सदराचे पुस्तक काढण्याचाही प्रस्ताव ठेवला होता परंतु तो नाकारला गेला. मी डोंबिवलीच्या नाट्य परिषदेच्या स्मरणिकेमध्ये देखील तसा प्रयत्न केला होता पण तो यशस्वी झाला नाही.

माझा एक वेबसाईट बनविण्याचा देखील विचार सुरू आहे. पण संग्रहाचा पसारा बघून कोणी काम स्वीकारायलाच तयार होत नाही. काही जणांनी मला स्वत:हून विचारले पण त्यांना आधी पैशाची काळजी होती. मला कोणीतरी झोकून काम करणारा हवा आहे मग मी त्याला पैसे कसेही देईन.

**तुम्हाला काही सांगायचे आहे काय?**

सह्या गोळा करण्यासाठी माझे विशिष्ट असे काही उद्दिष्ट नाही. जसे जमेल तसा मी छंद जोपासतो आहे. हो पण काही विशिष्ट लेखक कवी सोडून इतर लेखकांच्या सह्या गोळा करायला मला आवडत नाहीत तसेच पाकिस्तानी गायक, कलाकारांच्या सह्या मी गोळा करतो पण क्रिकेटिअर्सच्या अजिबात नाही. 'ते त्वेषाने खेळतात, युद्धात सैनिक मरत असताना क्रिकेट खेळणे ही एक क्रूर थट्टा आहे.' असे मला वाटते.

छंदाने काय मिळते असे बरेच जण मला विचारतात. त्याबद्दल मी असे म्हणेन, 'हल्ली लोक फक्त पैशाने किंमत करतात पण मला असे वाटते की छंदाने मला आनंद दिला, मन:शांती दिली, खूप शिकविले.

चार लोक मला ओळखायला लागले आणि हे माझ्यासाठी नक्कीच अभिमानास्पद आहे. माझ्याकडे जो संग्रह आहे त्याला प्रचंड किंमत आहे पण ती मला लावायची नाही. पैसे कमविणे पाप नाही पण दुसऱ्याच्या पैशाकडे बघू नये. दुसऱ्यावर जळण्यात आपली शक्ती फुकट घालविण्यापेक्षा काहीतरी करण्यात ती खर्च करा.

मी पैशाने गाडी विकत घेऊ शकतो पण माझ्याकडे आहे ते कोणी पैशाने विकत घेऊ शकत नाही. हे सर्व करताना हजारो हात मदत करतात. काही ज्ञात तर काही अज्ञात. अज्ञात हात मात्र माहित नाहीत पण ज्ञात हात खूप आहेत.

उदाहरणार्थ : अनिल शिंदे, प्रवीण दवणे, सतीश शिंदे, सचिन तेंडुलकरचे सेक्रेटरी आणि माझे मित्र रमेश पारधे, सिंधू पटवर्धन, अनुपमा उजगरे अशा असंख्य हातांनी मला मोठे केले. मी त्यांचा ऋणी राहीन, ऋणी रहाण्यातच माझे जमिनीवर पाय रहाण्याचे गुपित आहे.

तर असे हे 'सही'वेडे श्री. सतीश चाफेकर मान्यवर प्रसिद्ध व्यक्तींच्या सह्यांबरोबरच त्यांच्या भेटीची क्षणचित्रे, ध्वनीफिती, CD, भेटवस्तू, पत्रे अशा अनेकविध वस्तूंचा भरपूर संग्रह त्यांच्याकडे आहे. आणि या सर्व संग्रहाचे एक वेगळे असे संग्रहालय त्यांच्या या वास्तूमध्ये उभे करण्याचा त्यांचा मानस आहे. तरी त्यांच्या या संग्रहालयासाठी आमच्या शुभेच्छा !

**मुलाखत - सौ. दीपाली हिंदळेकर**

वि.प्र.मंडळाची डॉ.वा.ना.बेडेकर व्यवस्थापन संस्था, ठाणे

प्रतिक्रियांसाठी
दूरध्वनी
☞ २५४२ ६२७०

सीडी परिचय


# 'सुभे कल्याण'

लेखन : विवेकानन्द गोडबोले

सार्वजनिक वाचनालय, कल्याणद्वारा प्रकाशित

राष्ट्राचे इतिहास लिहले जातात. देशांचे इतिहास लिहिले जातात. देवांचे, धर्माचे, जातीचे व समाजांचेही इतिहास लिहिले जातात. परंतु जी गावे व नगरे यांनी समाज व राष्ट्र बनते याचा इतिहास क्वचितच लिहिला जातो. राष्ट्रांच्या आणि राजवटींच्या इतिहासात जी मोठी मोठी परिवर्तने व घटना घडलेल्या असतात त्यांचे स्थूलदर्शन त्या त्या इतिहासात घडते. परंतु मुलभूत धागे हे निरनिराळ्या ठिकाणांच्या घटना, व्यक्ती, प्रसंग, भौगोलिक परिस्थिती इ. वैशिष्ट्यांमध्ये गुंतलेले असतात. देशाचे, राष्ट्रांचे इतिहास, घटना व परिवर्तने या पायाभूत गोष्टींनी बलवान झालेले असतात. त्यामुळे मोठ्या मोठ्या इतिहासांचा सूक्ष्म अभ्यास होण्यासाठी, ऐतिहासिक सत्ये उजेडात येण्यासाठी व त्यांना योग्य न्याय मिळण्यासाठी स्थानिक वैशिष्ट्यांचे इतिहास हे फार महत्त्वाचे ठरतात, परंतु ते क्वचितच लिहिले जातात.

अशाच प्रकारे ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले, स्थानिक वैशिष्ट्यांचे इतिहास असलेले एक शहर म्हणजे 'कल्याण'.




उल्हास, काळू आणि भातसा यांच्या त्रिवेणी संगमावर वसलेले कल्याण म्हणजे 'प्रभू रामचंद्रा'च्या पवित्र पदस्पर्शाने पावन झालेली पुण्यभूमी, यक्ष धनवंत 'कुबेराची' राज्यभूमी, महाबलाढ्य 'रावणाची' निवासभूमी, महर्षी कणव व विश्वामित्रपुत्री शकुंतला, आद्यकवी वाल्मिकी यांची आश्रमभूमी व समाधीभूमि, पटचक्र निवारक शालिवाहनांची आश्रयभूमी, 'गाहा सत्तसई' या पहिल्या मऱ्हाठी काव्याचा व वाल्मिकी सातवाहन राजा श्रीवत्सहाल याची ही निवासभूमी. शिवछत्रपतींच्या नैतिक चारित्र्याची किर्ती त्रिखंडात पसरवणारी ही भूमी. भारतातील पहिल्या महिला डॉक्टर डॉ. श्रीमती. आनंदीबाई जोशी याच भूमीतल्या.

अशाप्रकारे ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या 'कल्याण' शहराचा इतिहास लिहावा असे ठरविले गेले. हा इतिहास लिहिण्यामागे पण एक ऐतिहासिक गोष्टच कारण घडली.

दुर्गाडीवरील वरदायिनी भवानी दुर्गामाता मंदिराबाबत वाद चालू होता. त्या वादाच्या कामी निरनिराळे पुरावे गोळा करून, संशोधन करून मंदिराच्या बचावाकरिता प्रयत्न करावा असे ठरले व या संशोधनामुळे इतर गोष्टींचे सुद्धा संशोधन होऊन त्याबराबेरच कल्याणचा इतिहासही लिहिला जावा असे ठरले. संशोधनासाठी ''इतिहास संशोधन मंडळाची'

स्थापना चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८९० दिनांक २९ मार्च १९६८ शुक्रवार रोजी सायंकाळी ७ वाजता श्री. विवेकानन्द गोडबोले, श्री. मुकुंद दुमकर, दाणेकर गुरूजी, प्रभाकर मोडक, गोपीनाथ घुमरे यांनी केली.

श्री. विवेकानन्द गोडबोले यांच्या १०-१२ पिढ्या सुमारे २५० वर्षे कल्याण शहरात स्थायिक झालेले आहेत. त्यामुळे श्री. विवेकानन्द गोडबोले यांनी कल्याणचा इतिहास लिहिण्याचे ठरविले व त्यांनी 'सुभे कल्याण' हे पुस्तक लिहिले.

यामध्ये संपूर्ण कल्याणचा इतिहास म्हणजे श्री. भगवानवीर परशुराम यांचा काळ, रामायण काळातील सुभे कल्याण, सातवाहन काळातील अपूर्वाई, सातवाहनांचा उदय काळ, कल्याणचे सांस्कृतिक जीवन, सुभे कल्याणचे दर्यावर्दी स्वामी शिल्पाहार, सुभे कल्याणचा स्वातंत्र्याचा संग्राम, सांस्कृतिक जीवन, कल्याणमधील देवस्थाने, ऐतिहासिक स्थळ विशेष, थोर समाजसेवक, ऐतिहासिक बांधकामे व घराणी इ. सर्व गोष्टींचा इतिहास सचित्र लिहिला गेला आहे.

याबरोबरच सार्वजनिक ग्रंथालयाबद्दल संपूर्ण माहिती या ग्रंथालयाचा इतिहास दिलेला आहे. या वाचनालयाला १२७ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. १८७८ साली या ग्रंथालयाची स्थापना झाली. तेव्हा या ग्रंथालयाचे नाव 'म्यूरल जनरल लायब्ररी' असे होते. नंतर काही काळाने 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' आले होते व नंतर सार्वजनिक वाचनालय, कल्याण असे ठेवले गेले. सामाजिक संस्थांमध्ये डोळ्यांचा दवाखाना, ब्राह्मणसभा, नमस्कार मंडळ इ. गोष्टींचा संस्थांचा यात समावेश आहे, त्या सर्व संस्थांचा इतिहास लिहिलेला आहे.

हा सर्व इतिहास संशोधकांना अभ्यासावयास मिळावा, अधिक सोप्या प्रकारे समजावा व अभ्यासाबरोबरच मनोरंजनही व्हावे, यासाठी सार्वजनिक ग्रंथालय, कल्याण यांनी या 'सुभे कल्याण' पुस्तकाचे, ग्रंथांचे रूपांतर सी.डी.मध्ये करावयाचे ठरविले व त्यांनी 'सुभे कल्याण' नावाची सी.डी. तयार केली. या सी.डी.चे प्रकाशन ५ डिसेंबर २००४ रोजी शिवशाहीर मा. बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले.

अतिशय सुंदररीतीने मांडलेले विभाग, संपूर्ण माहिती, वेळोवेळी आवश्यक तिथे छायाचित्रे यांचा सुरेख रीतीने संगम होऊन एक वेगळाच उच्च प्रकारचा दर्जा या सी.डी.ला लाभला आहे. जुने कल्याण व सध्या अस्तित्वात असलेले कल्याण यातील मुख्य गोष्टींचे, वास्तूंचे छायाचित्रही यामध्ये उपलब्ध करून दिलेला आहे.

यामध्ये प्रास्तविक, संदेश, छायाचित्र, सुभे कल्याण असे मुख्य विभाग पाडलेले आहेत. यामुळे हवी ती माहिती आपण बघू व त्याचबरोबर वाचू शकतो. 'संदेश' या विभागात कृष्णराव धुळप (राज्यसभा-सभासद) व गोडबोले परिवार यांच्या 'सुभे कल्याण' या पुस्तकावरील प्रतिक्रिया त्यांच्याच हस्ताक्षरात उपलब्ध केलेल्या आहेत आणि याबरोबरच पार्श्वसंगीताची सोय सुद्धा उपलब्ध आहे. त्यामुळे अशाप्रकारे संपूर्ण कल्याण शहराच्या सचित्र इतिहास या सी.डी.द्वारे उपलब्ध करून दिलेला आहे. याचा फायदा संशोधकापासून सामान्य वाचकांपर्यंत होतो. त्यामुळे सी.डी. बघणे हा एक अभ्यासपूर्ण अनुभव आहे.

**– स्मृती जोशी**

ग्रंथालयशास्त्र निष्णात वर्ग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**आपल्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.**

**- संपादक**

# जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीचा तंत्रशिक्षणावरील प्रभाव

*अमरावती येथील तंत्रशिक्षण संस्थांच्या परिषदेत सादर झालेला हा आणखी एक शोधनिबंध, उद्योगसमूह व तंत्रशिक्षण संस्था यांचे संबंध दृढ होणे गरजेचे आहे, हा मुद्दा यात आला आहे.- संपादक*

स्वतंत्र भारताने गेली दोन शतके अभियांत्रिकी व तंत्रशिक्षणात लक्षणीय कामगिरी केली आहे. या शोधनिबंधात सध्याचे अभियांत्रिकी शिक्षण, त्यातल्या त्रुटी, आव्हाने व संधी याचा आढावा घेतला आहे.

झपाट्याने झालेले औद्योगिकीकरण व आर्थिक वाढ यामुळे भारतातील अभियांत्रिकी व तंत्रशिक्षणातील प्रगती इतरांच्या तुलनेत जलद आहे. सध्याची भारताची वैज्ञानिक प्रगती विशेषत: अंतराळ, अणुकार्यक्रम, माहिती तंत्रज्ञान यातील प्रगतीमुळे भारताचे जगात वेगळे स्थान निर्माण झाले आहे.

तंत्रशिक्षण एखाद्या देशाची प्रगती आणि सामाजिक आर्थिक स्थिती दर्शविते व त्यासाठी भारतात कौशल्यपूर्ण तज्ज्ञांची निर्मिती करण्यासाठी उच्च प्रतीच्या अभियांत्रिकी शिक्षणाची गरज आहे.

भारतातील तंत्रशिक्षण हे तीन माध्यमातून दिले जाते.

१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI)
२) तंत्रनिकेतन
३) अभियांत्रिकी महाविद्यालय

विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये वेगाने वाढत आहे. सरकारचा तंत्रशिक्षणावरील खर्चही वाढत आहे. गेल्या दोन दशकात कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र व आंधप्रदेश यासारख्या प्रगत राज्यात अभियांत्रिकी महाविद्यालयांची व विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढली आहे.

आजच्या माहिती तंत्रज्ञानयुगात माहिती हे एक शिक्षणाचे प्रमुख स्त्रोत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अभियांत्रिकी शिक्षणात खालील त्रुटी प्रामुख्याने आढळतात.

१. अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील शिक्षकांची नेमणुकीच्या पद्धतीत बदल अत्यंत आवश्यक आहे. सद्यस्थितीत शिक्षकाची नोकरी ही एक Stepping Stone म्हणून केली जाते. एका आढाव्या अंतर्गत असे दिसून आले की, २ ते ३% शिक्षकानाच शिकवण्यात रस असतो. बरेच जण शिक्षकी पेशाकडे वळतात कारण त्यांना Industry मध्ये नोकरी मिळत नाही. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे. जसे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात शिक्षकाची नोकरी मिळण्यासाठी D.Ed, B.Ed करणे आवश्यक आहे. तशाच प्रकारची System तंत्रशिक्षणात आणणे गरजेचे आहे व तंत्रशिक्षणात शिक्षकाची नोकरी करण्यापूर्वी अशा प्रकारचे शिक्षण घेणे अनिवार्य करायला हवे. नाण्याची दुसरी बाजू पाहिली तर ज्याना शिकवण्यात खरा रस आहे. ते या क्षेत्राकडे वळत नाहीत कारण Industry मध्ये त्याना जास्त facilities मिळतात.

२. अभ्यासक्रमात वेळोवेळी बदल करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानात बदल झपाट्याने होत आहेत. त्याचा वेग व अभ्यासक्रमातील बदलाचा वेग याचा मेळ बसत नाही. Industry च्या अपेक्षा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात

कमी पडतो. ३ ते ४ वर्ष अभियांत्रिकी किंवा तंत्रनिकेतनातले शिक्षण घेतल्यावर विद्यार्थ्याला Industryत नोकरी मिळते. Industryला पुन्हा विद्यार्थ्यांना training द्यावे लागते. म्हणजे महाविद्यालयात शिकवलेले शिक्षण कुठेतरी कमी पडतेय. Industry व Institute मधील दरी कमी करणे आवश्यक आहे. Industry-Institute Cell अधिक कार्यक्षम हवा. विद्यार्थ्यांसाठी Industrial Visits जास्तीत जास्त व्हायला हव्यात.

३. शिक्षकाने स्वत:ला बदलायला हवे. प्रशिक्षण शिबीरे, संमेलने यांचे आयोजन सारखे व्हायला हवे. ही शिबीरे शिक्षकांनी गांभीर्याने घ्यायला हवीत. Audio Visual aids चा वापर जास्त हवा. सध्याची शिक्षण पद्धती (खडू-फळा) ही अतिशय पुस्तकी झाली आहे. शिक्षकाने इतर शाखांमधलेही ज्ञान आत्मसात करावे.

४. या सर्वांसाठी Management ने निधी उपलब्ध करून घ्यावा.

### उच्चशिक्षण व तंत्रज्ञानातील बदल

उच्चशिक्षण व तंत्रज्ञानातील संशोधन याचा निकटचा संबंध आहे. सध्याची सामाजिक व आर्थिक स्थिती ही तंत्रज्ञानातील बदलाशी जुळलेली आहे. माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात खूप बदल होत आहेत. मुख्यत्वे

१. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील संवाद जगाच्या कानाकोपऱ्यातून होऊ शकतो.
२. अनेक संस्थांची (जगभरातील) वाचनालये उपलब्ध होणे.
३. शिक्षणाचा खर्च कमी होतो.

### उच्चशिक्षणातील आव्हाने व संधी

१. सरकारसमोरील आव्हान आहे ते उच्च शिक्षणातील संस्थाना उत्तेजन देणे व जागतिक स्तरावर alliance करणे.
२. जागतिक स्तरावर वेगवेगळे अभ्यासक्रम राबवणे शक्य झाले आहे.
३. मोठे आव्हान आहे ते कोर्सेसचा दर्जा राखणे.
४. ज्या अभ्यासक्रमाचा हेतू हा केवळ पैसा मिळवणे आहे त्यांना प्रतिबंध करणे.
५. आपल्या देशातील जवळजवळ ७५% लोकसंख्या इंटरनेटने जोडलेली नाही. त्यामुळे Internetची सोय आणखी वाढायला हवी.

विकसनशील देशातील उच्च शिक्षणाची मागणी सतत वाढत आहे. विकसनशील देशातील विद्यार्थ्यांसाठी चांगल्या दर्जाचे On line Courses चालू करणे हे विकसित देशांपुढे आव्हान आहे.

सर्वात मोठे आव्हान आहे ते मानसिक दृष्टिकोन बदलण्याचे विद्यापीठांनी व तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनी बदलत्या सामाजिक गरजांना प्रतिसाद द्यायला हवा.

### अभियांत्रिकी शिक्षण - आव्हाने व संधी

भारतातील तंत्रशिक्षणात, तंत्रज्ञानातील बदल व जागतिकीकरण यामुळे फार बदल झाला आहे. परंतु हा बदल इतर देशांच्या तुलनेत हळू आहे. जवळ जवळ ५०% अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने ही प्रगत राज्यात आहेत. (आंधप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक व तामिळनाडू) तंत्रशिक्षणाच्या या विषम वितरणांमुळे प्रादेशिक असमतोल वाढतोय. अभियांत्रिकी शिक्षणात मुख्यत्वे खालील आव्हाने आहेत.

१. बहुतांशी खाजगी शिक्षणसंस्था यांनी शिक्षणक्षेत्रातला Business केलय. केवळ नफा मिळवण्याचा हेतू आहे. सामाजिक बांधिलकी नाही.
२. युवकांना तंत्रशिक्षणाकडे वळविणे. अभियांत्रिकी शिक्षण हे जास्त खर्चिक होत आहे. त्यामुळे जागा

रिकाम्या राहतात. ही परिस्थिती ग्रामीण भागात जास्त गंभीर आहे.

३. आय.टी. क्षेत्रातील योग्य व कार्यक्षम शिक्षकांचा तुटवडा.

४. आय.टी.शी संबंधित शाखांचे जास्त प्रमाण आहे. विद्यार्थीसंख्या कमी होत आहे.

५. अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षकाचा पेशा स्वीकारण्यास कमी ओढा.

६. शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे.

७. परदेशातील विद्यापीठांशी मोठी स्पर्धा आपल्या विद्यापीठांना करावयाची आहे.

८. सॉफ्टवेअरचा दर्जा व त्याची सुरक्षितता हे मोठे आव्हान आहे.

अभियांत्रिकी शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये Analytical व Logical Thinking निर्माण करते. निर्णयक्षमता, शिस्त विद्यार्थ्यांत येते परंतु खालील गुण विद्यार्थ्यांत निर्माण करण्यात अभियांत्रिकी शिक्षण कमी पडते.

१. संवाद कौशल्य
२. Interpersonal Skill
३. Introspective Nature
४. Learning to learn

अखेरीस असे म्हणता येईल, जर अभ्यासक्रम हा Industry च्या गरजानुसार तयार झाला तर Industry Institute नाते दृढ होईल व हे समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी उपयुक्त होईल.

**प्रा. डी. के. नायक**
प्राचार्य, व्ही.पी.एम्. तंत्रनिकेतन

**प्रा. टी.व्ही. मोहितेपाटील**
वरिष्ठ व्याख्याता, व्ही.पी.एम्. तंत्रनिकेतन

(पृष्ठ क्रमांक १८वरून)

**समाज प्रबोधन पत्रिकेतील ग्रंथपरिचय आणि ग्रंथपरीक्षणांची सूची**

४२. *आत्मचरित्र*
**'चंदेरी दुनियेत'** चिटणीस, लीला
पुणे : श्रीविद्या प्रकाशन, १९८१
(कान्हेरे, अंजली)
सप्रप/मार्च-एप्रिल८२/१०४ पृ. ११२ ते ११४

४३. *कथा संग्रह*
**'जांभळढव्ह'** चंदनशिव, भास्कर
लोकवाङ्मय प्रकाशन
(रूपनावर, भगवान)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर ८१/१०२ पृ. ३९६

४४. *राजकीय समीक्षा*
**'जेनीसीस ऑफ पाकिस्तान'**
नगरकर, व्ही.व्ही.
१९७५
(सुराणा, पन्नालाल)
सप्रप/नोव्हेंबर-डिसेंबर७५/६६ पृ. ४०८ ते ४१२

४५. *कादंबरी*
**'जोगीण'** भेंडे, सुभाष
(बांदिवडेकर, चंद्रकांत)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोंबर ८१/१०१ पृ. ३१७ते ३१९


४६. *कादंबरी*
**'टिकली येवढं तळं'** देशपांडे, निर्मला
मुंबई : पॉप्युलर प्रकाशन
(कुलकर्णी, इरावती)
सप्रप/सप्टेंबर-ऑक्टोंबर ८१/१०१ पृ. ३१७ते ३१९.

**(उर्वरित भाग पुढील अंकात)**

# अलौकिक संत श्री समर्थ रामदास

*ठाण्यातील संस्थाजीवनाची जी सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहेत त्यात श्रीसमर्थ सेवक मंडळाचा 'दासनवमी उत्सव' हा एक आहे ! श्रीसमर्थ रामदास स्वामींचे जीवन चरित्र व त्या पार्श्वभूमीवर उत्सवाची माहिती येथे देण्याचे प्रयोजन म्हणजे मार्च महिन्यात याच संस्थेने डॉ. शंकर अभ्यंकर यांची 'समर्थ रामदास' या विषयावरील प्रवचने आयोजित केली. सदर लेखाच्या निमित्ताने समर्थ चिंतनाची प्रेरणा मिळावी ही अपेक्षा. - संपादक*

महाराष्ट्र देशाचे अतिशय उत्कट वर्णन करताना कविवर्य गोविंदाग्रज म्हणतात, ''मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा । प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा ॥'' माझे तुला शतश: प्रणाम असोत आपला महाराष्ट्र नावाप्रमाणेच ''महाराष्ट्र'' आहे. ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रात तो अग्रेसर असून भारताचा मानबिंदू व केंद्रबिंदू आहे. अनेक स्वातंत्र्यसेनानी, विचारवंत, बुद्धिवंत, कलावंत, साहित्यिक, क्रीडातपस्वी या आणि अशा सर्वच क्षेत्रातील दिग्गजांनी राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान केले आहे. परंतु याहून अधिक महत्त्वाचे आणि महाराष्ट्राला अतिशय थोर आणि उज्ज्वल आणि संतपरंपरा लाभली आहे. म्हणूनच माऊली या भूमीला ''संताची मांदियाळी'' असे संबोधतात. संतांच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने ही भूमि अतिशय पवित्र, मंगल आणि समृद्ध झाली आहे.



खरतर आपल्या लेखी सर्वच संतमंडळी अतिशय थोर आणि परोपकारी आहेत. त्यांनी समाजाला प्रबोधित तर केलेच परंतु त्यांना सन्मार्गाला लावले आणि जीवनाचा अर्थ समजावून सांगितला. परंतु या संतांच्या नामावलीत संत साहित्याचे गाढे अभ्यासक, विद्वान, व्यासंगी विद्यावाचस्पती डॉ. शंकर अभ्यंकर यांच्या दृष्टीने संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास आणि तुकाराम हे पंचशिरोमणी आहेत. जनकल्याणासाठी त्यांचं विशेष योगदान आहे. ते म्हणतात, 'संत ज्ञानेश्वर, म्हणजे महाराष्ट्र संस्कृतीचा आत्मा, संत नामदेव त्याची जिव्हा, ऐकोबा हे कष्ठ, तुकोबा साक्षात हृदय आणि श्री समर्थ रामदास हे मस्तक होत. महाराष्ट्र संस्कृतीच्या या पंचप्राणांमुळे ही संस्कृती अक्षर, अजर, अमर झाली आहे. डॉ. यशवंत पाठक म्हणतात, ''सर्व संतांमध्ये श्री समर्थांचे स्थान अलौकिक असून ते वेगळेपणा दर्शविणारे आहे.''

चारशे वर्षांपूर्वीचा काळ आठवा, पाच पातशाह्यांनी महाराष्ट्रात धुमाकूळ घातला होता. मोगलांनी अत्याचाराची परिसीमा गाठली होती. खायला अन्न नाही, नेसायला वस्त्र नाही, स्त्रियांवर अनन्वित अत्याचार होत असत आणि स्वजनांची अत्यंत क्रूरतेने आणि निर्दयतेने हत्या करण्यात येत होती. याचे विदारक आणि अंगावर शहारे आणणारे वर्णन ग्रंथराज दासबोधात समर्थांनी केले आहे. सारा समाज भयग्रस्त, चैतन्यहिन, बलहीन आणि निष्क्रिय झाला होता. त्याला जागृत करण्यासाठी त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी, त्यांनी निष्क्रियावस्था दूर करण्यासाठी एका समर्थ, कुशल, सशक्त आणि शत्रूला जरब बसवेल अशा नेतृत्वाची गरज होती. श्री समर्थांनी

हे ओळखले आणि छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या अलौकिक सामर्थ्य, बुद्धी आणि युक्ती असलेल्या जनहित दक्ष राजांच्या सहकार्याने ते करवून घेतले व समाजाला भय आणि चिंतामुक्त केले. ज्या राष्ट्रांमध्ये क्षात्रतेज आणि ब्राह्मतेज हातात हात घालून कार्य करते तेच राष्ट्र आपली अस्मिता आणि अस्तित्व जगाला दाखवून देते. हे सप्रमाण सिद्ध केले.

वर उल्लेख केलेले समर्थांचे वेगळेपण आणि श्रेष्ठत्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसून येते. वयाच्या केवळ आठव्या वर्षी नारायण आईला म्हणतो, 'चिंता करतो विश्वाची' यावरून त्यांची विचार प्रगल्भता आणि बुद्धीची झेप लक्षात येते. प्रत्यक्ष श्री प्रभूरामचंद्र हे त्यांचे गुरु आणि श्री मारुतीराय उपगुरु होते. बारा वर्षे पुर:श्वरण करून श्री प्रभुरामचंद्रांना त्यांनी प्रसन्न करून घेतले. बारा वर्षे देशाटन करून सभोवतालच्या प्रदेशाची सर्वांगीण माहिती आणि तेथील सामाजिक परिस्थितीत अवलोकन केले. सूर्यनमस्कार आणि सूर्योपासना यांच्या सामर्थ्याने त्यांची शरीरयष्टी, पिळदार, देखणी आणि तेजस्वी झाली होती. वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, औषधी वनस्पती यांचे उत्तम ज्ञान त्यांना होते. पक्षांची, प्राण्यांची भाषा त्यांना चांगल्याप्रकारे अवगत होती हे सर्व आपल्याला ग्रंथराज दासबोधामध्ये वाचायला मिळते. समर्थांनी प्रपंचातून परमार्थ सांगितला. प्रसंगी ते म्हणतात, ''**आधि प्रपंच करावा नेटका । मग पहावे परमार्थ विवेका ।।**' मराठी भाषेतील सर्व वृत्तांतून त्यांनी अभंगरचना केली. समर्थांना ७३ वर्षांचे आयुर्मान लाभले. अशा अलौकिक संतश्रेष्ठीचे ''यत्न तो देव जाणावा'' हे जीवन सूत्र होते. समर्थांची करुणाष्टके तर करुणेचा अप्रतिम नमुना असून निर्दयी व्यक्तीला देखील पाझर फोडण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. 'मनाचे श्लोक' हे तर त्यांच्या एकूण वाङ्मयाचे सार (creame) असल्याचे म्हटले जाते.

समर्थांनी स्त्रियांना देखील मानाचे स्थान दिले आहे. राष्ट्रकार्यात मग ते सामाजिक, राजकीय वा धार्मिक असो योग्य संधी, परिस्थिती आणि मार्गदर्शन दिल्यास स्त्रियाही सामजिक कार्य करू शकतात हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. आपल्या स्त्री महंताना मठस्थापनेपासून ते शिष्यवर्ग वाढविण्यापर्यंत त्यांनी पूर्ण स्वातंत्र्य दिले. वेण्णाबाई, आक्काबाई, बहिणाबाई, सीताबाई, गंगाबाई या आणि अशासारख्या स्त्री शिष्यांची नावे आपणास देता येतील. मठपती होण्यासाठी सर्व पात्रता स्त्रियांमध्ये आढळल्यास त्यांनाही दीक्षा देऊन समर्थांनी मठपती महंत केले आहे. यावरून साडेतीनशे-चारशे वर्षांपूर्वी स्त्रियांकडे पहाण्याचा त्यांचा हा दृष्टिकोन किती आदराचा, समतेचा आणि सन्मानाचा होता हे आपणास दिसून येईल. सामाजिक सुव्यवस्था, सुरचना आणि कुटुंबातील स्त्रीचे महत्त्वाचे स्थान या सर्व गोष्टींचा समर्थांनी जाणीवपूर्वक विचार केलेला दिसतो. प्रपंच नेटका करण्यासाठी स्त्री व पुरुष या दोघांचे सारखच महत्त्व आहे हे त्यांना अभिप्रेत आहे. स्त्रीचे काम फक्त 'उदंड लेकुरे' प्रसविण्याचे नाही हाही विचार त्यांनी स्पष्टपणे मांडला. स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू नसून तिला समाजात एक नागरिक म्हणून, स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वाभिमानाने आणि सुरक्षिततेने जगता आले पाहिजे, तो तिचा अधिकार आहे हे समर्थांनी प्रकर्षाने सांगितले. स्त्रियांकडे उदात्त मानवतावादी दृष्टिकोनातून, एक सर्वांगीण सहस्त्र दलाप्रमाणे विकसन पावणारे व्यक्तिमत्त्व म्हणून समतेने पाहणारे व स्वकृतीने प्रत्यक्ष तसे सिद्ध करणारे श्री रामदास खरोखरीच समर्थ आहेत. त्यांच्या द्रष्टेपणामुळेच त्यांचे हे आगळं-वेगळे व्यक्तिमत्त्व साऱ्यानाच भावते आणि सामर्थ्याचा अनुभव येतो.

''ग्रंथराज दासबोध समाज शास्त्राचा उत्कृष्ट नमुना असून कोणत्याही काळात मानवाला तो मार्गदर्शक ठरेल.'' असे विचार ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी व्यक्त केले असून तो संग्राह्य ग्रंथ असल्याचे प्रतिपादन केले आहे. समर्थांनी बलशील आणि ज्ञानाची उपासना केली आहे आणि याचे उत्तम द्योतक म्हणजे आसेतुहिमाचल, त्यांनी मारुती मंदिराची स्थापना केली. त्यांचे ११०० मठ केवळ

सांस्कृतिक केंद्रे नव्हती तर श्री छत्रपती शिवाजी महाराजांची खलबतस्थाने होती. समर्थांच्या आरत्या विशेषत: गणपतीची, शंकराची आणि देवीची महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली असून गणपतीच्या आरतीला अग्रक्रमांक दिला जातो. त्यांनी एकूणच ग्रंथरचना संसारी व्यक्तीला केंद्रस्थानी मानून केली असल्यामुळे दासबोधात सांगितलेली मूर्ख लक्षणे, उत्तम पुरुषाची लक्षणे व उत्तम श्रोता कसा असावा? हे आजच्या काळातही उपयोगी पडतात. श्रीप्रभुरामचंद्राकडे त्यांनी पावनभिक्षा, अभेद भक्ती, तद्रुपता, संगीत, गायन, अलाप गोडी, शब्द मनोहर, सज्जन संगती या आणि अशा सारख्या गुणांची मागणी केली परंतु शेवटी अलिप्तपण पण मज दे रे राम असेही ते म्हणतात.

**''जय जय रघुवीर समर्थ' किंवा 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असो सर्व भूमंडळी कोण आहे ।।''** या आणि अशा अभंग पंक्ती अगदी मनापासून ऐकल्या, वाचल्या, अगर खणखणीत आवाजात म्हटल्या की अंगात जोश येतो, उत्साह येतो. आत्मविश्वास जागृत होतो व जणुकाही श्रीप्रभुरामचंद्र आपल्या पाठीशी उभे असल्याची आंतरिक भावना आणि जाणिव निर्माण होऊन आध्यात्मिक बळ मिळते. 'हर हर महादेव' च्या गर्जनेमुळे लढवैरुयाच्या अंगात वीरश्री निर्माण होऊन शत्रूवर विलक्षण ताकदीने तो तुटून पडतो असे आपला इतिहास सांगतो.

समर्थ या शब्दाचा साधा, सरळ अर्थ म्हणजे बलवान, शक्तिवान परंतु याहून समर्पक आणि सुंदर व्याख्या संत साहित्याचे गाढे अभ्यासक, थोर विचारवंत, सिद्धहस्त लेखक व वक्ते डॉ. यशवंत पाठक यांनी मांडली आहे. ते म्हणतात, ''समर्थ म्हणजे ज्ञानी, समृद्ध, सम म्हणजे योग्य.'' ''जीवनाचा योग्य अर्थ ज्याला सापडला तो समर्थ.''

जनसामान्यांविषयी परमेश्वराकडे साकडे घालताना अतिशय आर्ततेने, कळकळीने समर्थ म्हणतात, ''अपराधी जन चुकतची गेले ! तुझा तुची सावरी ! कल्याण करी रामराया ! जनहित विचरी, कल्याण करी रामराया.'' त्यांची संभ्रमावस्था दूर कर, केलेल्या चुका, अपराधांबद्दल क्षमा कर आणि त्यांना सद्बुद्धी व सन्मार्ग दाखव. अशा अलौकिक संत महात्मयाचे अतिशय योग्य व सुरेख वर्णन करताना कवी म्हणतो, ''शुका सारीखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचे । कवी वाल्मिकासारिखा मान्य जैसा । नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥''

अशा या अलौकिक संतश्रेष्ठीचा उत्सव 'श्रीमद् दासनवमी उत्सव' शुक्रवार, दि. २५ फेब्रुवारी ते ५ मार्च २००५ या कालावधीत संपन्न झाला. यंदाचे उत्सवाचे १०१ वे वर्ष होते. संस्थेला आणि ठाणे शहराला अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. संस्थेच्या दृष्टीने उत्सवाला विशेष महत्त्व आहे. कारण ज्यांच्या नावाने आणि ज्यांचे अधिष्ठान डोळ्यासमोर ठेवून संस्था कार्य करीत आहेत. त्यांचा हा उत्सव आहे. 'मुख्य ते हरिकथा निरुपण' हे संस्थेचे ब्रीद वाक्य आहे.

प्रतिवर्षी उत्सवाचे निमित्ताने लोक शिक्षण आणि प्रबोधन व्हावे या जाणिवेतून अनेक मान्यवर व्यक्तींची व्याख्याने, कीर्तने, प्रवचने, विविध भजनी मंडळाची भजने असे आध्यात्मिक, विविध कार्यक्रम आयोजित केली जाते. त्याचबरोबर तीनही शाळा व श्रीहनुमान व्यायाम शाळा यातील विद्यार्थ्यांसाठी विविध पाठांतर व वक्तृत्व स्पर्धांचे देखील आयोजन केले जाते. उत्सवाचा नैमित्तिक भाग या दृष्टीने पहाटे काकड आरती, मंत्रपुष्प आणि भजन असे आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या व्यतिरिक्त सामुदायिक गीतापठण, लघुरुद्र, सहस्त्रावर्तन यांचेही सामुदायिक पठणाने भाविकांना कृतार्थ होता येते.

**श्री. सुरेन्द्र लागू**
चरई, ठाणे
दूरध्वनी : २५३४ ९३४१

# गीता - यज्ञ
## अर्थात् जीवनाचे आचरणशास्त्र (भाग १-२-३)

लेखक - दिलीप वासुदेव आपटे, मिरज

*गीतेवरील काही महत्त्वपूर्ण ग्रंथांची माहिती वाचकांना व्हावी, या माहितीचा आपल्या अभ्यासात, संशोधनात उपयोग व्हावा या उद्देश्याने श्रीमती आशा भिडे यांनी करून दिलेला हा ग्रंथपरिचय. या माहितीवर काही विचारमंथन व्हावे या दृष्टीने वाचकांना विशेष विनंती की त्यांनी 'दिशा'शी संपर्क साधावा. - संपादक*

भाग पहिला - प्रथमावृत्ती - मे २००३ मूल्य ५० रु., पृष्ठे १४८

भाग दोन - प्रथमावृत्ती - डिसे. २००३ मूल्य ५० रू. पृष्ठे १३८

भाग तीन - प्रथमावृत्ती - आक्टो. २००४ मूल्य ७० रू. पृष्ठे १९२

भाग १-२-३ चे हक्क वाचकांचे आधीन असे तिसऱ्या भागावर छापले आहे.

तिन्ही भागांचे प्रकाशक - गीता फौंडेशन, मिरज

भाग पहिल्यात १ ते ६ अध्याय आहेत.

प्रार्थना - वाचकांनी पुस्तक सुरुवातीपासून वाचावं. तसंच एकदा वाचून समजलं नाही तर पुन्हा पुन्हा वाचा. शनि, रवि. सर्वांनी एकत्र (कुटुंबियांनी) बसून वाचा. दोन महिन्यात पुस्तक पूर्ण होईल. शंका असल्यास, सुधारणा हवी असल्यास लेखकाशी संपर्क साधा.

पुस्तक लेखकाकडेच मिळू शकेल. न आवडल्यास मूल्य परत दिले जाईल. गीतेचा प्रसार हाच यामागे उद्देश आहे. गीतेचा कुठलाही आवडता श्लोक मोठ्या अक्षरात अर्थासह लिहून घराच्या दर्शनी भागी लावा. या पुस्तकातला भगवंताचा फोटोही काढून तिथे लावा. जाता येता भगवंताचे स्मरण करा.

गीतेचे तत्त्वज्ञान पूर्ववयातच मी समजून घेऊन आचरणात आणले नाही तर माझे अडणार आहे ही भावना दृढ करा असा आग्रह लो. टिळकांनी गीतारहस्यात धरला आहे. गीतेच्या चिंतनातून, अभ्यासातून मला जो भौतिक आनंदापेक्षा वेगळा, निर्मळ आनंद मिळाला. तो आनंद इतरांना देण्यासाठी ह्या तीन भागांचे पुस्तक प्रसिद्ध करण्याचे प्रयोजन. मनोगतात लेखक म्हणतो आमचा काळ बरा होता म्हणण्याची पाळी यावी इतक्या भयानक तणावाच्या अस्थिरतेच्या वातावरणात आजचा तरुण काम करतोय. याचा शरीर व मनावर विपरीत परिणाम न होऊ देण्यासाठी गीताध्ययनाचा मार्ग त्यांच्यासाठी (नव्हे त्यांच्यासाठीच) उपलब्ध आहे. म्हणून तरुणवयातच गीता हाती घ्या, समजून घ्या आणि ती आचरणात आणा. हे एकच कळकळीचे सांगणे, विनंती आहे.

अनुक्रमणिकेत - लेख क्र. १ गीता माहात्म्य. यात लेखकाने जीव तोडून गीतेचे माहात्म्य सर्वांना उदाहरणांची रेलचेल करून समजून सांगितले आहे. त्यानंतर लेख क्र.२ गीता अध्याय १ व २ (अनुक्रमणिकेत प्रत्येक लेखाचे नाव दिले आहे पण नंतर गीता अध्यायाव्यतिरिक्त लेखावर त्या त्या लेखाची नावे आहेत पण अध्यायावरील लेखावर कोणत्या अध्यायावर हा लेख आहे त्या अध्यायाचे नाव नाही. अध्याय क्रमांक व लेख क्रमांक एकच आलेले नाहीत. अनुक्रमणिका त्यामुळे सारखी पहावी लागते. हा

दोष पुढील आवृत्तीत सुधारावा म्हणून निदर्शनास आणला आहे.)

अनुक्रमणिका पहा - लेख क्र. २ वर अध्याय १-२, लेख क्रमांक ३, लेख क्रमांक ४ अध्याय ३, लेख क्रमांक ५- अध्याय ४, लेख क्रमांक ६ - प्राणायाम साधना, लेख क्रमांक ७ - अध्याय ५, लेखक्रमांक ८ - अध्याय ६. त्यानंतर परिशिष्ट १ - भगवंताच्या स्वरुपाचे ध्यान, परिशिष्ट २ - गीता अध्याय १ ते ६.

**लेख क्र. २** - अध्याय १ ला 'अर्जुन विषाद योग।' यात विषाद म्हणजे depression अध्याय २ - wait करण्याचे शिक्षण ज्याला मिळत नाही किंवा वर आकाश अशी open space होती किंवा it was there as it is. We called that space as WTC. हे उदाहरणादाखल दिले आहे पण असे इंग्रजी शब्द व वाक्ये तीनही भागात बरेचदा स्पष्टीकरणाच्या निमित्ताने आली आहेत. आपले म्हणणे ठासून सांगण्यासाठी म्हणून किंवा आजच्या इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या युवा पिढीला समजावं, आकर्षित करावं या उद्देशानं लेखकानं वारंवार इंग्रजीचा वापर केला आहे. पण त्यामुळे रेशमी, मऊसूत वाळूतून चालताना मधेच खडकावर ठेच कळावे तसे वाटते.



**गीता काय सांगते** - Do not think what happen in future and do not anxious about present. Just perform your duty to the best of your ability. या एकाच श्लोकापासून खूप शिकण्यासारखे आहे. गीता एक अखंड स्फूर्तीचा स्त्रोत आहे.

नुसता अर्थ समजून घेणे म्हणजे गीता अभ्यास नव्हे. त्याचा मला जीवनात काय उपयोग आहे, माझ्या वागणुकीत मी बदल करायला हवा का? जीवन समृद्ध करण्यास मला त्याचा कसा उपयोग करता येईल? या दृष्टिकोनातून स्वत: विचार करणे म्हणजे खरा गीता अभ्यास. प्रत्येकाला शाश्वत सुखाची अभिलाषा असते हे नक्की. फक्त अडचण कोणती असेल तर आपल्या बाबतीत शाश्वत कोणते हेच आपण समजू शकत नाही. धन प्राप्तीत आपण व्यग्र होतो पण परमेश्वर प्राप्तीच्या कर्मात आपण (इंद्रिये) व्यग्र होत नाहीत. इंद्रियाचे विषय आपल्या कर्तव्याच्या आड येतात. धनप्राप्तीमुळे मिळणारे सुख इंद्रिय गोचर असते (ते क्षणिक, अशाश्वत, नाशिवंत असले तरी आणि ईश्वर प्राप्तीपासून मिळणारे सुख सत्-शाश्वत असले तरी ते इंद्रियांना जाणवत नाही. म्हणून आपण त्यात व्यग्र होत नाही.

एखाद्या स्त्रीला झणझणीत चमचमीत पदार्थ खूप आवडतात. पण गरोदरपणी डॉक्टरने मना केल्यास होणाऱ्या अपत्याच्या प्रेमामुळे ती त्या गोष्टी सोडते. तसे भगवंतावरील प्रेमामुळे विषय प्रेम सुटले पाहिजे. भगवंतावरील प्रेम म्हणजे आत्मस्वरूपात रममाण होणे.

बऱ्याच वेळा आपली बुद्धी इंद्रियांच्या आधीन होऊन निर्णय घेते त्या अर्थाने We are corrupt (हे पुस्तकातलेच शब्द आहेत.)

काही उदाहरणे लेखकाने चांगली दिली आहेत. उदा. कर्मात अकर्म पाहणे. रेल्वे प्रवासात झाडे उलट दिशेने पळत आहेत असे वाटते. वास्तविक ती स्थिर असतात. हेच कर्मात अकर्म पाहणे. याउलट निरभ्र आकाशात ग्रह तारे स्थिर दिसतात. परंतु प्रत्यक्षात ते अत्यंत गतिशील असतात हेच अकर्मातील कर्म.

दुसरे उदाहरण नदी वाहते. अखंडपणे वाहते. ज्याला ज्याला ज्या कारणासाठी पाणी हवे त्याला त्याला ती नि:स्वार्थीपणे देत असते. मग तो साधू असो वा डाकू असो पशू असो वा पक्षी. श्रीमंत असो वा गरीब. तिचे वाहण्याचे काम सतत चालू असते. तिला फरक पडत नाही. हेच कर्मातील अकर्म.

नदीला वाहणे हे ही माहित नाही. कुठलाही उद्देश न ठेवता ती वाट मिळेल तिकडे वाहत जाते. त्यामुळे शेते

पिकतात, वीज निर्मिती होते, प्यायला पाणी मिळते. सर्वांना जीवन मिळते. परंतु ती यासाठी वहात नसते. सूर्य पण उगवण्याचे काम करतो त्याच्या अस्तित्वामुळे जग चालते. हेच अकर्मातील कर्म.

गीतेतील पहिल्या सहा अध्यायात कर्म कसे करावे या प्रक्रियेवर भगवंतानी भर दिला आहे. त्यामुळे अंत:करण शुद्धी होते अशा अंत:करण शुद्धीसाठी त्यांनी प्राणायामाचा मार्ग सांगितला आहे म्हणून लेखकाने पहिल्या भागात 'प्राणायाम साधना' हा स्वतंत्र लेख समाविष्ट केला आहे. जेणेकरून मन स्थिर व एकाग्र होण्यास पात्र होऊन ध्यानाची पूर्वतयारी होईल.

गीतेतील तत्त्वज्ञानाच्या अनुषंगानेच हा विषय आला आहे. परिशिष्ट १ मध्ये 'भगवंताच्या स्वरूपाचे ध्यान' यात श्रीमत भागवत - स्कंध ३, अध्याय २८, श्लोक २१ ते ३४ या अत्यंत उपयुक्त श्लोकाचे पठण / चिंतन होण्याच्या दृष्टीने मूळ श्लोकांसह त्यावर विवेचन केले आहे. दुसऱ्या भागातही 'तेन त्यक्तेन भुजीया:' या लेख क्रमांक ९. दुसऱ्या भागातला पहिला लेख यात Own Personality Development उपनिषदरूपी OPD जाऊ व 'ईशावास्योपनिषदातील' पहिल्या मंत्रावर विचार करू. लेख क्रमांक १९, शेवटचा लेख 'सत्यं परम धीमहि'. यात भागवतातील पहिल्याच श्लोकात 'भगवंताचे ध्यान करू असे सांगण्यासाठी 'सत्य परं धीमहि' म्हटले आहे. त्याचेच यात चिंतन केलेले आहे. भागवत ग्रंथ उपयुक्त आहे, सुंदर आणि अमूल्य आहे. लेखकाचा 'भागवत व उपनिषदांचा अभ्यासही सखोल आहे, व्यासंग दांडगा आहे हे मान्य केले तरी त्यामुळे गीतेच्या अध्यायाच्या परिणामात बाधा व विवेचनात, अभ्यासात विस्कळितपणा आला आहे. तिसऱ्या भागातही 'गर्भसंस्कार' लेख क्र. २५ तसेच लेख क्र. २७ 'गीता आणि शिक्षण' हे प्रकरण घातले आहे. हे विषय गीतेला उपयुक्त व त्याअनुषंगानेच आलेले आहेत. तरीही त्यांचे स्वतंत्र पुस्तक काढता आले असते. त्यामुळे विस्कळितपणा व विस्तार वाढला आहे. गीतेचा प्रसार व्हावा, घराघरात ज्ञानेश्वर जन्मावेत या अत्यंतिक तळमळीनेच लेखकाने हा प्रपंच केलेला आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

'गीता-यज्ञ' भाग पहिल्यात शेवटी गीतेचे ६ अध्यायांचे श्लोक दिलेत पण नंतर भाग दोन व तीन मध्ये पुढील अध्यायांचे श्लोक दिलेले नाहीत. ते विस्तार भयास्तवच दिलेले नसावेत.

मनाची चंचलता जाऊन अंत:करण शुद्ध झाल्यावर भगवंताचे ध्यान करायचे. पण म्हणजे नक्की काय करायचे हे समजायला हवे आणि म्हणून (भाग दोन) ७ ते १२ या अध्यायात भगवंत स्वत:ची ओळख करून देतात. सत्यस्वरूप अशा माझे ध्यान कर असे सांगतात

भगवंताची इच्छा आहे की प्रत्येकाने त्याचा अभ्यास करावा. तर मग 'यतन्तश्च दृढव्रता:' होऊन श्रद्धेने प्रयत्न का नको? भगवंताना वाटते की आपण प्रत्येकाने त्यांच्या स्वरूपाशी एकरूप व्हावे. गीतेच्या शेवटच्या सहा अध्यायात त्याबाबतचे मार्गदर्शन केले आहेच. त्याचेच चिंतन, विवेचन भाग तीनमध्ये केले आहे.

तेराव्या अध्याय 'क्षेत्रक्षेत्रज्ञाचा'. देह म्हणजे क्षेत्र व जीवात्मा म्हणजे क्षेत्रज्ञ. अनेक जन्माच्या तपश्चर्येनंतर हा दुर्लभ असा मानव देह लाभलाय. आणि त्याचे सार्थक करायचेय तर या देहाच्या मदतीनेच मी भगवंताच्या परम्धामाला पोचू शकतो. याकरिता देहाकडे बदलायला हवा व तो आसक्तीयुक्त भावनेने बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा व तो बदलायचा असेल तर त्या देहाकडे गुरू रूपात पहायचे. देहाबद्दलच्या भावनांचे उच्चीकरण, शुद्धीकरण करायचे. तेराव्या अध्यायाच्या या विवेचनानंतर लेखक चौदाव्याच्या विवेचनात म्हणतात - गंमत पहा हं! भगवंत प्रत्येक व्यक्तीत आहेत असे मानणे हा विचारच मुळी चुकीचा आहे. ही स्थिती मानायची कशाला? ते तर सत्य आहे. तसे मानण्याची आवश्यकता नाही - ते तर आहेतच. तेव्हा एकदा याचे ज्ञान झाले की भगवंता बरोबरचे

अव्यभिचारी 'संबध-भक्ती प्रस्थापित झालीच. परंतु ज्यांना मी पत्नी, आई-वडिल, बहिण-भाऊ, शत्रू-मित्र मानतो त्या व्यक्तीत भगवंताचे अस्तित्व एकदम पहाणे सोपे काम नाही. मग अभ्यासाला सुरुवात कशी करायची?

तर दररोज झोपेत आपण कोणाचे कोणी नसतो. त्या अवस्थेत कुठल्याही नात्याचे जबाबदारीचे ओझे माझ्यावर नसते. म्हणून झोपेतून उठल्याउठल्या मी प्रसन्न उत्साही असतो. सर्व नातेसंबंधांची झूल मी दिवसभर वागवून दमतो. रात्री ती झूल मी उतरवून ठेवतो, परत घालतो हे आयुष्यभर चालते. ही झूल उतरवलेल्या स्थितीत भगवंताबरोबर संबंध मला दृढ करता आला तर ! झोपेतील अवस्था मला झोपेतून उठल्यावरही काही काळ तशीच चालू ठेवता आली तर ! म्हणून झोपेतून जागे झाल्यावर लगेचच एक तास मी जाणीवपूर्वक भगवंताचा होण्याचा प्रयत्न करायचा. (सर्वत्र शांतता असताना म्हणजे पहाटे या अभ्यासाची सुरूवात करणे सोपे. रोज सहाला उठत असेन तर पाचलाच उठायचे.)

मी जसा आहे तसा सलग एक तास या निर्विकारी निर्विचारी अवस्थेत राहू शकणार नाही. मग या उद्देशाला पूरक कामे या एक तासात करू. यातील -

भाग १ ला - (५ मिनिटांचा) - 'मी फक्त माझाच राहण्याचा प्रयत्न करायचा.' म्हणजेच मी म्हणजे देह नव्हे. मी एक तत्त्व आहे, परमात्म्याचा अंश आहे म्हणून परमात्मस्वरूप आहे हा विचार दृढ करायचा आणि या तत्त्वाला एका जागी स्थिर राहण्याचा आधार / साधन म्हणजे हा देह.

गाडी पार्क करून आपण ऑफिसात कामाला जातो. तसे या देहाला एक तास बाजूला ठेऊन म्हणजे पूर्णपणे विसरून म्हणजे देहाविषयीच्या सर्वाला विसरून 'मी कोण आहे? माझे स्वरूप काय हे ओळखण्याचा प्रयत्न करायचा. (गाडी आपण आपल्या उपयोगासाठी खरेदी केलीय. तसा हा देह आपण भाड्याने घेतलाय. आपल्या संचित कर्माचे फळ भोगण्यासाठी.) 'अहं ब्रह्मास्मि' मीच भगवन आहे. मी देह आहे ही भावना मनातून काढून त्याठिकाणी ही भावना दृढ करायची. भगवंत म्हणतात 'जशी ज्याची श्रद्धा तसे व्यक्तिमत्त्व बनते.' 'मी कोण आहे?' याचे उत्तर पुस्तकात मिळणार नाही ते ज्याचे त्याने हुडकायचे आहे. एकदा हे उत्तर मिळाले तर जाणण्यासारखे काहीच उरणार नाही.

भाग २ रा - (१० मिनिटाचा) देहातील व बाहेरील चैतन्यतत्त्व / प्राणतत्त्व हे वेगळे नाही एकच आहे हा संबंध दृढ होणे आवश्यक. या प्राणतत्त्वाचा अभ्यास म्हणजे 'प्राणायाम' साधना करायची. (भाग पहिला लेख क्र. ६ मधे पहा.)

भाग ३ रा (३० मिनिटांचा) यात भगवंताचे चरित्र, लीलाकथा वाचा, गीता, भागवत, रामायण वाचा. वाचून त्याचे चिंतन, मनन, अभ्यास करा.

भग ४ था - (१५ मिनिटांचा) स्थिर आसनात बसा व नाम जप करा. यावेळी मनात इतर विचार न आणण्याचा प्रयत्न करा. व्यवहारात जसे एखाद्या व्यक्तीचे नाम उच्चारण आपण त्या व्यक्तीचे लक्ष वेधण्यासाठी करतो. तसे देवाचे नाम घेताना सुद्धा त्याचे लक्ष जावे. आपली आर्ततेने घातलेली साद त्याला ऐकू जावी हा भाव हवा तरच तो जप हा 'जपयज्ञ' होईल.

केळ्याचे साल सोलले की गर बाहेर काढण्याची वेगळी क्रिया करावी लागत नाही. तद्वत देहातीत, गुणातीत झाल्यावर भगवत तत्त्व वेगळे समजावून सांगावे लागत नाही. कारण अशी अवस्था अनुभवण्यात जो परमानंद आहे ती परमावधी म्हणजेच परमतत्त्व. ते तत्त्व समजावण्याचे नाही तर अनुभवायचे आहे.

पंधराव्या अध्यायाबद्दल लेखक सांगतात. या अध्यायात परमपुरुषाला प्राप्त करून घेण्यासाठी, परमपदाला पोचण्यासाठी पाच गुण आत्मसात करणे आवश्यक आहेत. ते भगवंत सांगतात -

१) निर्मान मोह - मान व मोहाने विरहित असलेले

२) जिसङ्ग दोषा - आसक्ती, द्वेष जिंकलेले

३) अध्यात्म नित्या : - अध्यात्मज्ञानाचे ठिकाणी जे स्थिर आहेत. अध्यात्मयोग म्हणजे Union with Self स्व-स्वरूपाचे अनुसंधान - भगवंताशी विभक्त न होणे.

४) विनिवृत्त कामा : - निष्काम म्हणजे कामनारहित झालेले

५) सुखदु:ख संज्ञै - सुखदु:ख अशा द्वंद्वातील झालेले द्वंद्वै: विमुक्ता :

पंचभूतात्मक देहातील हे गुण नष्ट झाल्यास निर्गुण तत्त्व प्राप्त करून घेणे अवघड नाही.

'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्' हा संचिताना संबंध तोडण्यासाठी 'योग: कर्मसु कौशलम्' म्हणजे कर्म कुशलतेने करावे' हा भाग अध्याय तिसऱ्यात सविस्तर आलाय.

'सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो' मी सर्व प्राण्यांच्या हृदयात स्थित आहे' हा मंत्र सतत जपण्याचा, आचरणाचा आहे मग भगवत् प्राप्ती आपोआपच अनुभवास येईल. नित्याची अशास्त्रीय वागणूक बदलून शिस्तबद्ध करणे हे प्रपंच मोक्ष दृष्ट्या करण्यासाठी आवश्यक.

हे माझ्यासारखा सामान्य माणूस सांगतो म्हणून कोणीही दुर्लक्ष करू नये. कारण लेखक म्हणता हे माझे सांगणे नव्हेच. अत्यंत प्रेमापोटी भगवंतच आपल्याला त्यांचा पत्ता सांगत आहेत. सर्व साधकांनी, वाचकांनी, माणसांनी त्या पत्त्यावर भगवंतांना हुडकण्याचा प्रयत्न करावा.

**न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावक:**
**यद्गत्वा न निवर्तन्ते ताद्धाम परमं मम ॥ १५.६**

लेख क्र. २५ गर्भसंस्कारावर आहे. प्रजनन कार्यापासूनच गीतेच्या संस्काराची सुरुवात केली तर पुढच्या पिढीत घरोघर ज्ञानेश्वर जन्माला येतील. (हा लेख पुस्तकात घेण्याअगोदरच लेखकाने झेरॉक्स प्रती काढून जास्तीत जात लोकांपर्यंत (नवविहाहित दांपत्यांपर्यंत) पोचवण्याचा प्रयत्न केला तो स्तुत्य आहे.) म्हणून हा लेख मूळातूनच वाचणे जास्त योग्य होईल.

लेख २७ वा 'गीता आणि शिक्षण' यात प्रत्येक मनुष्य हा जन्मत: पूर्ण ज्ञानी असतो तर शिक्षण कशाला हवे? तर त्याच्या ज्ञानावर मायेचे, अज्ञानाचे आवरण असते ते आवरण शिक्षणाने काढायचे. गीतेत म्हटले आहे की सुरुवातीस हे आवरण धुराप्रमाणे अगदी तरल असते. फुंकर घातली की ते जराशा प्रयत्नाने दूर होते. वय वाढले की आवरण दाट होते. मग ते काढणे खूप अवघड होते.

सर्व तपातील मुलांची तक्रार असते की वाचतो ते समजत नाही, लक्षात रहात नाही, मन एकाग्र होत नाही. गीता यावर उपाय सांगते -

**यतो यतो निश्चयति मनश्चंचलमस्थिरम् ।**
**ततस्तस्तौ नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत ॥**
**गीता ६.२६**

चंचल मनाला आवरणे हे वाऱ्याची मोट बांधण्याएवढे कठीण आहे, असे अर्जुन कृष्णाला सांगतो पण तेहा भगवंत उत्तर देतात - 'हे अवघड निश्चित आहे पण अशक्य नाही. विवेक आणि अभ्यासाने ते साध्य होऊ शकते. मन आणि बुद्धीचे सूक्ष्म व्यापार चाललेले असतात. त्याची ताकद प्राणायामामुळे तीव्र होते म्हणून प्राणायाम साधना अनिवार्य.

मुलगी लग्न होऊन सासरी जायची असते म्हणून लहानपणा पासूनच ती तिच्यावर तसे संस्कार करत असते. लग्न ठरेपर्यंत मुलीची सुद्धा एक भूमिका तयार झालेली असते तरी मुलीची सासरी पाठवणी करताना तिला शेवटचे उपदेशाचे सार सांगतेच. तिच्या डोळ्यातले भाव सर्व काही सांगून जातात. त्या सासरी जाण्याच्या प्रसंगात जशा आई/

मुलीच्या भावना गुंतलेल्या असतात तशाच प्रकारचा हा अठराव्या अध्यायातील उपसंहार आहे असे लेखकाने म्हटले आहे.

भगवान अर्जुनाला संपूर्ण गीतेत कर्मयोगाचे महत्त्व समजावून सांगतात आणि त्यासाठी कर्म कसे करावे हे विस्ताराने सांगतात. आपली अवस्था अशी व्हायला पाहिजे की 'Yes भगवंता, तुम्ही जे सांगितलेत ते मला समजले मी आता तुमच्या सांगण्याप्रमाणे वागेन. ५४ ते ५७ या चार श्लोकात जे सांगितले आहे it is the culmination of all the philosophy or behavioural science expounded so far आतापर्यंत सांगितलेल्या कर्मयोग शास्त्राचा - तत्त्वज्ञानाचा - आचरणशास्त्राचा परमोच्च बिंदू होय.

सहासष्टाव्या श्लोकात भगवंत 'सर्वधर्मान्परित्यज्य' म्हणतात. काय हो अर्थ याचा? सर्व धर्माचा त्याग कर म्हणजे काय? खरंच हा विचार करण्यासारखा भाग आहे. धर्म म्हणजे काय? We will re-examine परत एकदा विचार करू. आपण समजतो तो religion असा अर्थ भगवंताला अभिप्रेत नाही आणि त्या अर्थाने धर्म हा शब्द गीताकाळात रुढही नव्हता. धर्म म्हणजे आवश्यक गुण. सर्व योनीतील क्षेत्रांचा धर्म चैतन्यतत्त्व म्हणून सर्वधर्मान्परित्यज्य म्हणजे धर्माचरणातील 'मी'पणाचा त्याग कर आणि 'मामेकं शरणं व्रज' मलाच अनन्य भावाने शरण ये. एकदा कर्मातला 'मी' पणा गेला की पापच काय पुण्यसुद्धा रहात नाही. बस्स. आता श्रीकृष्णः शरणं मम ।

या भागातला ३१ वा लेख 'मागणे हेचि आता' गीता यज्ञाची ही सांगता ही सात्विकरित्या करायची आहे. म्हणून गीता-यज्ञ परिपूर्ण व्हायला दक्षिणा देणे आवश्यक. ही दक्षिणा कोणती? कोणाला? कशी द्यायची तेही लेखकाने सागितलेय.

आपल्यापैकी प्रत्येकाने किमान एका गरजू मुलाची जबाबदारी घ्यायची. त्याचा सर्वांगीण विकास करायचा त्याला आपले मानायचे हे मोठेपणासाठी नाही तर भगवंताची सेवा म्हणून करायचे. माझ्या अन्यायकारक पैशाचा वेळेचा आणि बुद्धीचा उपयोग करून हे सत्कार्य करायचे. त्यामुळे मन:शांती मिळेल. हीच दक्षिणा हेच मागणे. त्याला उच्च शिक्षणासाठी सुद्धा पाठवा. बँका, सेवाभावी संस्था मदत करतात. गीता फौंडेशन सुद्धा आपणास सहकार्य करेल. We can do it, we will do it, we must do it. आपण सर्वांनी मिळून हे कार्य करू. आपण किती मुलांची जबाबदारी घेतलीत ते कळवा, अनुभव कळवा. आपणा सर्वांच्या प्रयत्नातून खात्रीलायकरित्या नवीन पिढी उत्तम नागरिक बनेल. कामाची सुरूवात भगवंताचे स्मरण करून करा त्याचे काम म्हणून करा.

हाच खरा 'गीता-यज्ञ', हीच पूजा, हीच सांगता. त्यामुळे 'मी'पणाचा लोप होऊन मोक्षाचा मार्ग हुडकण्याची जरूरी नाही. मग प्रत्येक व्यक्तीत आपोआप भगवंत दर्शन होऊ लागेल. म्हणून 'श्रीकृष्णः शरणं मम ।'

शेवटी परिशिष्टात 'श्रीमद् भगवत कथेचे आयोजन करण्याचे आवाहन' केले आहे. आपण आयोजन केलेत तर मी भगवंताची सेवा म्हणून भागवतकथा ज्ञान यज्ञ सप्ताह करण्यास तयार आहे.

जीवनातील सर्व आव्हाने, अडचणी, प्रश्न पैशाने सुटत नाहीत हे निर्विवाद सत्य आहे. मग ज्याच्या प्राप्तीने हे सर्व प्रश्न संपून जातील व निरंतर आनंदावस्था प्राप्त होईल तसा आवश्यक data भागवतात आहे. हे सर्व जाणून घेण्यासाठी भागवत सप्ताह म्हणजे सात दिवसाचा 'व्यक्तिमत्त्व विकासाचा' कोर्स करूया. तुम्ही संधी द्या. मी सेवा करेन. दोघेही त्यांना शरण जाऊ -

'श्रीकृष्णः शरणं मम ।'

नवीन पिढी new generation (त्यांच्यासाखेच म्हणते) सुसंस्कारित निपजावी म्हणून अत्यंत कळकळीने,

पोटतिडिकेने, कलमी आंब्याच्या झाडाला मोहोर येण्याच्या आधीच्या काळापासून त्याची कशी काळजी घ्यायची, मशागत करायची ते आंब्याची उत्तमप्रकारे आढी घालून त्याची निगा राखून उत्तम आंब्याची निर्मिती व्हावी या सद्भावनेने लेखकाने संपूर्ण 'गीता-यज्ञ' लोकांसमोर विशेषत: तरुण पिढीसाठी सादर केलाय. त्याचा 'श्रीकृष्ण: शरणं मम' म्हणून वाचकांनी विशेषत: तरुणांनी जरूर लाभ घ्यावा, आदर करावा.

'गीता-यज्ञाचे' तीनही भाग खालील पत्त्यावर मिळू शकतील.

**गीता फौंडेशन**
**सौ. जयश्री आपटे**
'चैतन्य' लोकमान्य सोसायटी,
पंढरपूर रोड, मिरज - ४१६ ४१०
फोन - ०२३३-२२३२०८२

**- आशा भिडे**
बी/९, विजय अर्पाटमेंटस्,
'आराधना', टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

**बांदोडकर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अलिकडे घेण्यात आलेली काही महत्त्वाची पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| 17379 | Flower of Sahyadri | Ingalhalikar, Shrikant |
| 17383 | गणित का आधार एवं विधान में भूमिका | महल, नरेंद्रसिंह |
| 17389 | Medicinal Plants I | Manisha, Vaibhav |
| 17390 | Medicinal Plants II | Manisha, Vaibhav |
| 17396 | कुछ खोजें, कुछं बनाए | Lautkishare, Zafri. A. |
| 17397 | Hello Stars | Shrinivasan, J |
| 17400 | Charles Darwin's Autobioaraphy | - |
| 17406 | Music of Life | Burma, D.P. |
| 17428 | शक्ती की ओर | जाधव, भारती |
| 17455 | पहिलं पुस्तक | राऊत, रमेश |
| 17468 | वेळ बहुमोल | शिदोरे, अनिल |
| 17469 | मुंबई : ज्ञात व अज्ञात | रायकर, यशवंत |
| 17473 | प्रज्वलित मने | कलाम, अब्दुल |
| 17476 | संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश<br>१९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड | गणोरकर, प्रभा व इतर |
| 17485 | पैस | भागवत, दुर्गा |
| 17488 | मृत्यूचे माहात्म्य | ठक्कर, हरिभाई; काशीकर, ब.शं. |

# परिसर वार्ता

## पत्रकारिता वर्ग

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात यंदापासून सुरू झालेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंपर्क या पदविका अभ्यासवर्गासाठी प्रात्यक्षिक अनुभव असणाऱ्या या क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

यात अल्फा टी. व्ही. च्या सुचेता करमरकर यांचे पहिले व्याख्यान झाले. इलेक्ट्रॉनिक माध्यमातील व्यवसायसंधी कोणत्या आहेत व या माध्यमात कसे पदापर्ण करावे या दृष्टीने त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रख्यात वृत्तपत्र छायाचित्रकार व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. केदार भट यांनी छायाचित्रण कलेचे या विषयातील महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला तर महाविद्यालयाचे आणखी एक माजी विद्यार्थी ॲड. गणेश सोहनी यांनी कायद्याची माहिती व वृत्तपत्रकरिता या विषयासंबंधी मार्गदर्शन केले.

मार्च महिन्यात दि. ६ रोजी ठाणे वैभव वृत्तपत्र व चित्रवाहिनीचे संपादक श्री. मिलींद बल्लाळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. ''पत्रकरांनी ग्लॅमर पेक्षा मेहनतीवर अधिक भर द्यावयास हवा.'' असे सांगून पत्रकारितेच्या मूळ ध्येयांचा विसर पडू देता नये असे मत व्यक्त केले.

जिल्ह्यातील सर्वात जुने वर्तमानपत्र दै. सन्मित्रचे व सन्मित्र चित्रवाहिनीचे संपादक श्री. विजय जोशी यांचे व्याख्यान रविवार दि. १३ रोजी सकाळी आयोजित करण्यात आले होते. वृत्तवाहिनी बाबत सविस्तर माहिती देऊन ते म्हणाले, ''नवीन तंत्रज्ञान पत्रकारांना माहित हवे.''

या वर्गात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी श्री. मिलींद बल्लाळ व श्री. विजय जोशी यांनी पारितोषिक देण्याचे कबूल केले.

ही सर्व व्याख्याने आयोजित करण्यासाठी अभ्यासक्रम संयोजक श्री. शशिकांत कोठेकर व श्री. रविंद्र मांजरेकर यांनी काम केले. त्यांना केंद्र संयोजक प्रा. मोहन पाठक यांचे मार्गदर्शन व साहाय्य लाभले. वर्गाचे ज्येष्ठ शिक्षक डॉ. सुधीर मोंडकर व अरविंद विंझे यांनीही उपस्थित राहून या वर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या वर्गाची परीक्षा मे मधे होणार आहे.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर-(पूर्व प्राथमिक विभाग)

संस्कृती कलादर्पणतर्फे घेण्यात आलेल्या बालनाट्य स्पर्धेत 'ध्रुवबाळ' या नाटकाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या नाटकाचे दिग्दर्शन व लेखन सौ. सुलक्षणा पाध्ये व सौ. अंजली पटवर्धन यांनी केले होते. या नाटकात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे - यशोधन पारनाईक, प्रतिक शेळके, ऐश्वर्या काटकर, साहिल भिंगारे व सेजल ठोंबरे.

तसेच लोकनृत्य स्पर्धेतील 'जोगवा' या नृत्याला द्वितीत क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या नृत्याचे दिग्दर्शन सौ. श्वेता कोकिळ व सौ. मनाली दिवेकर यांनी केले होते. या नृत्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे - तन्वी कांबळे, सलोनी मालुसरे, अंकिता माने, अंकिता पाटील व दर्शना देसाई.

घंटाळी प्रबोधिनीतर्फे घेण्यात आलेल्या नृत्यस्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. याचे नृत्यदिग्दर्शन सौ. पूर्वा खरे व सौ. सुप्रिया जोशी यांनी केले होते. या नृत्यस्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे - भाविका मोरे, भाग्यश्री किरकिंडे, ऐश्वर्या पिचुर्ले, प्रियांका

काटे.

या सर्व कार्यक्रमांना मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांचे विशेष मार्गदर्शन व सहाय्य लाभले.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडीयम स्कूल**

मॅकमिलन इंडिया लिमिटेड यांनी आयोजित केलेल्या आंतराष्ट्रीय इंग्रजी, गणित आणि विज्ञानाच्या परीक्षेला इयत्ता सातवीचे विद्यार्थी बसले होते. त्यांना यश पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १. | अश्विनी पाणगी | गणित - विशेष गुणवत्ता श्रेणी |
| २. | ओजस गोहाड | इंग्रजी- विशेष श्रेणी |
| | | गणित- विशेष श्रेणी |
| | | विज्ञान - विशेष श्रेणी |
| ३. | ऋचा कारखानीस | इंग्रजी - विशेष श्रेणी |
| | | गणित- विशेष श्रेणी |
| ४. | गौरेश नाडकर्णी | गणित- विशेष श्रेणी |

**चित्रकला स्पर्धा**

सकाळ तर्फे आयोजित बालकुमार चित्रकला स्पर्धेत इयता ६वी तील विद्यार्थिनी कु. भाग्यश्री फडके हिला संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम पारितोषिक मिळाले.

**चित्रकलेच्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा निकाल**

१. 'ए' श्रेणी मिळवून पास झालेले विद्यार्थी

१. भावलेकर तेजल प्रकाश

२. भासे सोनिया सुनिल

२. 'बी' श्रेणी मिळवून पास झालेले विद्यार्थी

१. धरमा सूप्रिया श्रीरंग

२. गांगल शरवरी प्रसाद

३. गोखले सुरभी मिलिंदकुमार

**इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा**

१. 'ए' श्रेणी मिळवून पास झालेले विद्यार्थी

१. छेडा रूची रमेश

२. दहाके आकाश अजित

२. 'बी' श्रेणी मिळवून पास झालेले विद्यार्थी

१. भोजाने रिद्धी रमेश

२. कारापूरकर सोनिया श्रीनिवास

३. पडाके प्राची प्रविण

४. पिसाळ सुमित साहेबराव

५. तम्हणकर दिपीका अरूण

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २००४ - २००५**

८५% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी - २

७५% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी - १३

**माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान**

या विषयावरील मार्गदर्शन कार्यशाळा १६ ते २० मे या दरम्यान आमच्या कला आणि वाणिज्य महाविद्यालयालच्या ग्रंथालय माहिती शास्त्र विभागाने आयोजित केली आहे. माहिती व संगणक तंत्रज्ञानाच्या किमान क्षमता ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचाऱ्यांत निर्माण करणे या उद्देशाने सदर कार्यक्रम घेण्यात आला असून कार्यशाळा महाविद्यालयाच्या संगणक विभागात घेतली

जाईल.

यात -

- संगणकीकरण : वर्तमानकालीन प्रवाह
- संगणकाची मूल तत्त्वे
- विंडोज
- पॉवर पाईंट
- इंटरनेट व इंट्रानिटस्
- ग्रंथालय वेब पेज निर्मिती
- ऑनलाईन शोध
- इ. जर्नलस्

या व अशा अनेक तंत्राचे प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात येईल. या साठी व्यासायिक ग्रंथपालांना संस्थांनी पाठविण्यास शुल्क रु. १८००/- आहे. तर विद्यार्थ्यांसाठी रु. १२००/- आकारण्यात येणार आहे.

संपर्क :

प्रा. नारायण बारसे, ग्रंथपाल,

जोशी-बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय, ठाणे.

E-mail : nbarse@hotmail.com, nbarse@vpmthane.org

दूरध्वनी : २५३८ १५९१

**पर्यायी ऊर्जा स्त्रोत**

या विषयावरील २ दिवसांची राष्ट्रीय परिषद आमच्या तंत्रनिकेतनात अयोजित करण्यात आली असून दि. २७ व २८ ऑगस्ट २००५ रोजी सदर परिषद होईल.

ती परिषद शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, उद्योजक व विशेषज्ञ यांना उपयोगी आहे. यात सौर ऊर्जा, जल ऊर्जा, बायोगॅस इ. ऊर्ज स्त्रोतांवर तज्ज्ञांचे शोधनिबंधाचे वाचन होईल. आजच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचा असणाऱ्या या विषयावरील परिषदेत सहभागी व्हावयाचे असेल तर तंत्रनिकेतनाशी संपर्क साधावा.

संपर्क तपशील :

श्रीमती ॲनिस ॲलियस, निमंत्रक
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन,
चेंदणी बंदर रोड, ठाणे ४०० ६०१.
E-mail : ges_vpl@rediffmail.com
दूरध्वनी : २५३६ ४४९४

- संकलीत

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म (शनिवार व महाशिवरात्र होती.) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२-४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ |
| १९४४ | विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला. याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३नोव्हें.) |
| १९४७ | डॉ. विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर) |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे) |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम |
| १९५२-५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना |
| १९५७ | विद्याप्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथ. विभाग) प्रारंभ |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढविली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात |
| १९७५ | विज्ञान महाविद्यालयाचे विभक्तीकरण |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल) |
| १९८३ | विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले |
| १९९९-२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २०००-२००१ | जोशी-बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास) |

(संकलन श्री. शरद लळित)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## • विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •

१) डॉ. बेडेकर प्राथमिक विद्यालय (मराठी माध्यम)

२) डॉ. बेडेकर माध्यमिक विद्यालय (मराठी माध्यम)

३) सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी)

४) सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विद्यालय (इंग्रजी)

५) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

६) ना. गो. बेडेकर वाणिज्य व के. ग. जोशी कला महाविद्यालय

७) टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

९) व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

१०) प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

भावे व्याख्यानमाला

व्ही.पी.एम्. दिशा

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ येथून प्रकाशित केले.